तुम्हाला तुमच्या बिजनेस व इंडस्ट्रीमध्ये खुप समस्या येत आहेत का? तुमची इंडस्ट्री व बिजनेस प्रॉफीटमध्ये नाही का?
तर आता काळजी करू नका...
तुमच्या इंडस्ट्री, बिजनेसमध्ये कोनत्याही प्रकारची तोडफोड न करता सायंटिफिक पद्धतीने एनर्जी बॅलन्स करून येत असलेल्या समस्येतून मुक्त व्हा आणि ते पण खात्रीशीर.
या पॉजिटिव्ह ट्रान्सफॉर्मेशनचा अनुभव घेण्यासाठी आमच्याशी संपर्क साधा
भूमाता ॲडव्हान्स वास्तू । रिसर्च सेंटर
सोनानगर चौक, कुष्टधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर
भगिरथ भारद्वाज
मो. 9529818737 / 0241-3599263
वेळ स.११ ते रा.८ कृपया अपॉइंटमेंट घेणे आवश्यक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १३.०६.२०२५ | अंक नं. ६३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

आमरसासह राजस्थानी थाळी
स्वादिष्ट.. रुचकर भोजनाचा आस्वाद घ्या..
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड,अहमदनगर. फोन : 2327060, 9850799850

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी — खरेदीवर पॉइंट — पॉइंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई +
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नाते..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# बेहिशोबी मोठी रक्कम बाळगणाऱ्या २ जणांना नगरमध्ये पकडले; लाखो रुपयांची रोकड जप्त

**गंज बाजार परिसरातील कारवाई**

नगर – बेहिशोबी मोठी रक्कम तसेच नोटा मोजण्याचे मशीन, ५ मोबाईल जवळ बाळगून बाजारपेठेत फिरणाऱ्या दोघांना बाळगणाऱ्या दोघांना आर्थिक गुन्हे शाखेच्या नगर मधील गंज बाजार परिसरातील कृष्णा टॉवर येथे पकडले आहे. त्यांच्या कडून १२ लाख ३९ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. १२ जून रोजी दुपारी ३.३० च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

याबाबतची माहिती अशी की पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी आर्थिक गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षक इसामोद्दीन पठाण, सहायक फौजदार शकिल शेख, पोलीस हवालदार मलीकार्जुन बनकर, पो. कॉ अमोल कांबळे, अक्षय भोसले, शुभम लगड यांना कळविले की, इसम नामे रोहीत अशोक बोबडे (वय २९), आकाश अशोक बोबडे (वय २७, दोघे रा.फलटण, जि.सातारा) हे बेकायदेशीररित्या मोठी रोख रक्कम घेऊन गंजबाजार येथे येणार आहेत, तरी त्यांना ताब्यात घेऊन कायदेशीर कारवाई करावी. अशा सूचना मिळताच पथकाने गंजबाजार परिसरात संशयित इसमांचा शोध घेतला. त्यावेळी त्यांना दोन इसम कृष्णा टॉवर येथुन येताना दिसले.

पोलिसांनी रोहीत बोबडे व आकाश बोबडे यांना ताब्यात घेवून त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या बॅगमध्ये ११ लाख ७८ हजार ४०० रुपये रोख रक्कम, १० हजार रुपये किंमतीची आयडियल कंपनीची नोटा मोजण्याची मशिन, १० हजार रुपये किंमतीचा विवो कंपनीचा मोबाईल, २० हजार रुपये किंमतीचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन, १० हजार रुपये किंमतीचा विवो कंपनीचा मोबाईल फोन, १० हजार ओप्पो कंपनीचा मोबाईल फोन, १ हजार नोकिया कंपनीचा मोबाईल फोन असा एकुण १२ लाख ३९ हजार ४०० रुपये किंमतीचा ऐवज मिळून आला. त्यांचेकडे या रक्कमेबाबत विश्वासात घेऊन विचारपुस केली असता त्यांनी कोणत्याही प्रकारचे समाधानकारक उत्तरे दिले नाही. म्हणुन पोलिसांनी पुढील कायदेशीर कारवाई करीता रोहीत बोबडे, आकाश बोबडे यांचेसह रोख रक्कम ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलीस हवालदार मलिकार्जुन बनकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन रोहित बोबडे, आकाश बोबडे यांच्याविरुद्ध मुंबई पोलीस कायदा कलम १२४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# जिल्ह्यात दुसऱ्या दिवशीही विजांसह वादळी पाऊस

**नगर शहराच्या बहुतांश भागात रात्रभर वीज पुरवठा खंडीत, नागरिकांचे हाल**

नगर – नगर शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सलग दुसऱ्या दिवशी १२ जून रोजी सायंकाळनंतर वादळी वारे व विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. या पावसानेही ११ जून रोजी झालेल्या पावसासारखी चांगलीच दाणादाण उडवली. वादळी वाऱ्यामुळे शहरातील बहुतेक भागातील वीज पुरवठा खंडीत झाला होता. तर ग्रामीण भागातही वीज पुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे रात्रभर वाढलेला उकाडा आणि डासांच्या त्रासाने नागरिकांचे चांगलेच हाल झाले.

जिल्ह्यात मे महिन्यात २२ दिवस अवकाळी पाऊस झाला. ५ ते ३० मे दरम्यान जिल्ह्यात २२० मिमी अवकाळी पावसाची नोंद झाली. त्यानंतर मात्र पावसाने काहीशी उघडीप दिली होती. यावर्षी १ ते ११ जूनपर्यंत जिल्ह्यात केवळ १६ मिमीच पाऊस झाला. त्यानंतर ११ जून रोजी सायंकाळनंतर सुमारे तासभर वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह

(पुढील मजकूर पान २ वर)

# प्लॉट देण्याच्या अमिषाने नगरमधील तिघांची ७ लाख २५ हजारांची फसवणूक

## दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – नालेगाव येथील लोकमंगल गृहनिर्माण संस्थेमध्ये ५०० स्क्वेअर फुटाचे प्लॉट देण्याचे अमिष दाखवून तिघांकडून ७ लाख २५ हजार रुपये घेऊन त्यांना प्लॉट न देता तसेच घेतलेली रक्कम ही परत न देता फसवणूक केल्याची घटना १ मार्च २०१२ पासून ते १२ जून २०२५ दरम्यान घडली. या प्रकरणी दोघांच्या विरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत कैलास नामपेल्ली उषाकोयल (वय ६१, रा. झारेकर गल्ली,अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की प्रकाश भुमय्या कोटा (रा.बालाजी सोसायटी, नगर-कल्याण रोड अ.नगर) व अशोक बाळु पुंड (रा. साई गजानन कॉलनी, लेखानगर, सावेडी) यांनी २०११ साली फिर्यादी यांना सांगितले की, आम्ही गोरगरीब लोकांसाठी लोकमंगल गृहनिर्माण सहकारी संस्था नालेगाव येथे स्थापन करणार आहोत. सदर योजने अंतर्गत रहिवासासाठी प्रत्येकी ५०० चौ. फुटाचे प्लॉट कमी भावामध्ये समाजातील गरजवंत लोकांसाठी देणार असुन या बाबत प्रकीया शासकीय कार्यालयात चालु आहे. तुम्हांला लोकमंगल गृहनिर्माण संस्थेत प्लॉट घ्यायचा असेल तर सांगा असे म्हणून फिर्यादीचा विश्वास संपादन केला.

फिर्यादी यांना राहण्यासाठी घराची आवश्यकता असल्याने त्यांचे बोलण्यावर विश्वास ठेऊन व त्याबाबत ॲड आर आर पिल्ले, नोटरी पब्लीक, कोर्टगल्ली, अ.नगर येथे १ मार्च २०१२ रोजी करारनामा करुन त्या व्यवहारापोटी प्रकाश कोटा व अशोक पुंड यांना लोकमंगल गृहनिर्माण संस्थेचे नावाने फिर्यादी यांनी ७५ हजार रुपये, पत्नी रत्नमाला हिने ७५ हजार, मुलगा सचिन याने ७५ हजार रुपये.व लहान मुलगा आकाश याने ७५ हजार रुपये असे एकूण ३ लाख रुपये दिले. तसेच लक्ष्मण राजय्या श्रीगादी यांनी त्यांचे चार मुले यांचे नावे एकूण ३ लाख रुपये महाराष्ट्र बँक खातेचे चेक व पावत्या व्दारे दिले होते. तसेच फिर्यादी यांची बहीण शशीकला सत्यनाराण मिटापेल्ली हिने देखील लोकमंगल गृहनिर्माण मध्ये प्लॉटसाठी १ लाख २५ हजार रुपये रोख स्वरुपात दिले.

त्यानंतर प्रकाश कोटा व अशोक पुंड हे कोणतीही कायदेशीर कारवाई करत नसल्याने यांनी त्यांना या बाबत विचारणा केली असता त्यांनी जिल्हाधिकारी यांच्या परवानगीबाबत व संस्थेमार्फत प्लॅन मंजुर करुन घेण्यासाठी शासकीय कार्यालयात प्रक्रीया चालु असलेबाबत सांगितले. त्यानंतर फिर्यादी व इतर लोकांनी या बाबत दोघांकडे वारंवार विचारणा केली असता त्यांनी लोकमंगल गृहनिर्माण संस्थेची मिटींग होणार आहे असे सांगुन प्लॉटचा ताबा देण्यासाठी कोणतीही कार्यवाही केली नाही. म्हणून फिर्यादी यांनी सरकारी कार्यालयात लोकंमगल गृहनिर्माण संस्थेसंबंधी विचारणा केली असता या संस्थेची परवानगी बाबत फाईल व प्रस्ताव प्रलंबित नसले बाबत समजले.

त्यानंतर फिर्यादी यांनी प्लॉटचा ताबा देण्याबाबत वारंवार विचारणा केली असता ते उडवाउडवीचे उत्तरे देवु लागले व पैशाची मागणी केली असता पैसे परत देण्यास नकार देवु लागले. तेव्हा फिर्यादी यांची खात्री झाली की, दोघांनी फिर्यादी व इतर अनेक लोकांकडुन प्लॉट देण्याचे नावाखाली पैसे घेऊन प्लॉट न देता तसेच घेतलेले पैसे परत न देता फसवणूक केली आहे. त्यामुळे या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात कैलास उषाकोयल यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन प्रकाश कोटा व अशोक पुंड यांचेविरुद बी एन एस ३१६ (२), ३१८ (४), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड हे करीत आहे.

SONI Since 1965 TILES
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संकष्ट चतुर्थी उपवासासाठी स्पेशल
शनिवार दि.१४ जून चंद्रोदय १०.०० मि.
टक्कर मलाई लस्सी
कैलास उडपी। लस्सी
शाखा नं. १ : शिवशक्ती अपार्टमेंट, खिस्त गल्ली, पिराजवळ, अहिल्यानगर.
शाखा नं. २ : तहसील कार्यालया समोर, टीव्ही सेंटर, सावेडी, अहिल्यानगर.
शाखा नं. ३ : पद्मावती पेट्रोल पंपाजवळ, नगर मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर.

पाचवे पुण्यस्मरण



स्व. अशोकलाल भिकचंदजी गांधी (गळनिंबवाला)
(संस्थापक : आनंद नागरी सहकारी पतसंस्था) स्व. दि. १३/६/२०२०
संघर्षातून केली वाटचाल जीवनाची, आशिर्वाद होते आपले आमच्या पाठीशी,
दिन आले आज यशाचे पण उणीव भासते आपल्या सहवासाची...
भावपूर्ण श्रद्धांजली
आनंद नागरी सहकारी पतसंस्था, अ.नगर
समस्त गांधी परिवार (गळनिंबवाला)
आनंद परिवारातील मा. चेअरमन व आजी-माजी संचालक, कर्मचारी वृंद
आनंद ठेव बचत प्रतिनिधी, सर्व हितचिंतक व सभासद, ठेवीदार, खातेदार

आता पाणी स्टोरेजची चिंता सोडा
अभय सेल्स घेऊन आले आहेत
100 ते 5000 लिटर पर्यंतच्या वॉटर टँक
3 लेयर, 6 लेयर, 8 लेयर
अधिकृत विक्रेते!
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd,
Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE

पुरुषांसाठी प्रिमियम कॉलिटी
टी-शर्ट / शर्टस् / फॉरमल पँट
ट्राऊजर्स / नाईट पँट
भरपूर व्हरायटीज् — काहीही घ्या — मर्यादित स्टॉक
₹ 200 ला एक
व ₹ 500 मध्ये तीन
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही
शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शहरातील ऐतिहासिक वास्तूंच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी पुरातत्व विभागाच्या कार्यालयासमोर 'ठिय्या आंदोलन'

नगर – शहरातील ऐतिहासिक वास्तूंचा वारसा नष्ट होत असताना, पुरातत्व विभाग हेतूपुरस्सर दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करुन समाजवादी पार्टीच्या वतीने जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथील पुरातत्व विभागाच्या कार्यालया समोर ठिय्या आंदोलन करुन निदर्शने करण्यात आली.

यावेळी घोषणाबाजी करुन पुरातत्व विभागाच्या चालढकल कामाचा निषेध नोंदविण्यात आला. शहर जिल्हाध्यक्ष आबिद हुसेन यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात आसिफ रजा, अल्ताफ लकडावाला, तन्वीर सय्यद, गनी राज, मतीन खान, एजाज हाजी, तन्वीर बागबान, रफिक बाबुलाल, मुनीर शेख, कलीम शेख, सईद खान, रशीद कुरेशी, समी अहमद, सरफाराज शेख, समीर बिल्डर आदी सहभागी झाले होते.

नुकताच शहराचा ५३५ वा वर्धापन दिवस साजरा करण्यात आला. शहराला मोठा ऐतिहासिक ठेवा लाभला आहे. ऐतिहासिक वास्तूंचा ठेवा जतन करण्याची व त्याची देखभाल करण्याची जबाबदारी पुरातत्व विभागाची आहे. मात्र या विभागाकडून शहरातील ऐतिहासिक वास्तूंकडे दुर्लक्ष केले जात आहे. बागरोजा येथे शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या समाधी स्थळाकडे जाणारा रस्ता नाही. इतर ऐतिहासिक वास्तूंची पडझड देखील झाली आहे. नियामत खानी गेटची दुरुस्ती गरजेची असून, त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्याच्या चहुबाजूंनी तळीराम बसलेले असतात. फराहाबाग येथील वास्तूची देखील गंभीर अवस्था झाली असून, या ऐतिहासिक वास्तूंची देखरेख आणि त्यांना सुरक्षा प्रदान न करता पुरातत्व विभाग दुर्लक्ष करत असल्याचे म्हंटले आहे. शहरातील ऐतिहासिक वास्तूंना संरक्षण द्यावे, पडझड झालेल्या ऐतिहासिक वास्तूंची दुरुस्ती करुन त्याचे जतन करण्याची मागणी समाजवादी पार्टीच्यावतीने करण्यात आली आहे.



शहरातील ऐतिहासिक वास्तूंना संरक्षण देऊन दुरुस्ती करण्याच्या मागणीसाठी समाजवादी पार्टीच्या वतीने जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथील पुरातत्व विभागाच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करुन निदर्शने करण्यात आली.

## प्रेरणादायी अक्षरधन...

“मुसाफिर”–९८२२०२०६९१



### व्हावा खरा श्रीगणेशा... राष्ट्रप्रेमाचा...

नव्या पिढीत, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीची जाणीव निर्माण व्हावी व 'नेशन फर्स्ट' हा विचार रुजवण्याच्या उद्देशाने पहिलीपासूनच सैनिकी शिक्षणाचे प्राथमिक स्तरावरील प्रशिक्षण दिले जाईल अशी घोषणा शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी नुकतीच केली.

सैनिकी शिक्षणाची शासनाची ही कल्पना देशाच्या संरक्षण, भविष्यासाठी पथदर्शक आहे आणि विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचा 'श्रीगणेशा' निर्माण करणारीही आहे.

सैनिकी प्रशिक्षण हा शब्द केवळ लष्कर, युद्ध एवढ्यांपुरताच मर्यादित नाही तर व्यापक दृष्टिकोनातून या प्रशिक्षणाकडे पाहावे लागेल. इयत्ता पहिलीपासून सुरुवात करीत असतांना या वयोगटात प्रामुख्याने बोजड अशा अवघड अध्ययन पद्धतीचा समावेश न करता त्या अभ्यासक्रमात सैन्य दलांचा इतिहास, तोंडओळख, भूतकालीन छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप, झाशीची राणी, बाजीराव पेशवे इ.च्या काळातील युद्धे, युद्धनीती, सैनिकी विभाग, अधिकारी प्रणाली, शस्त्रास्त्रांची माहिती, श्रेणी (रँक) या बाबींना प्राधान्य द्यावे. त्यातूनच विषयाची गोडी वाढून विद्यार्थ्यांना कुतुहल व आकर्षण वाटेल.

यातून अनेक प्रत्यक्ष अप्रत्यक्ष फायदेही होतील. डिजिटल युगातील विद्यार्थ्यांना तांत्रिक, एआयसारखी माहिती, उपयोग करतांना राष्ट्रभक्ती वाढवता येईल.

४ वर्षे सैन्य दलाचे प्रशिक्षण घेतलेल्या अग्नीवीरांना रोजगारासह यातून सरकारी यंत्रणावरील ताणही कमी होईल.

तरुणाईच्या आपल्या भारतात स्वदेशी उत्पादन, मेक इन इंडिया, बॉयकॉट विदेशी या साथीने राष्ट्र प्रथम ही भावना रुजू होऊन वाढल्यास आर्थिक, संरक्षण, सामाजिक विकासाबरोबरच आत्मविश्वास, धैर्य, व्यापक दृष्टिकोन, विकसित गुणांसह जबाबदार नागरिक घडू शकतील. त्यासाठी शुभचिंतन करू या.

**संदर्भ – हेमंत देशपांडे**

## जिल्ह्यात शस्त्रबंदी, जमावबंदी आदेश

नगर – जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्र.अपर जिल्हादंडाधिकारी अरुण उंडे यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये १३ जुन ते २६ जुन रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे.

सदरचे आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका, किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# शहरातील प्रायव्हेट स्क्रॅप ऑटो रिक्षा कायमस्वरूपी बंद कराव्या; परवानाधारक रिक्षा चालक रस्त्यावर उतरून आंदोलन करणार

नगर – अहिल्यानगर शहरातील प्रायव्हेट स्क्रॅप ऑटो रिक्षा कायमस्वरूपी बंद करून या रिक्षा चालकांची दादागिरी बंद करावी व परवानाधारक ऑटो रिक्षा चालकांना न्याय देण्याच्या मागणीसाठी अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक–मालक संघटनेच्यावतीने वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देताना संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले, उपाध्यक्ष दत्ता वामन, कार्य अध्यक्ष विलास कराळे पाटील, सरचिटणीस अशोक औषिकर, सुलेमान शेख, सुधाकर साळवे, अन्वर सय्यद, आमीन सय्यद, अनिल वैरागर, पीटर लोंढे, विजय उमाप, सादिक शेख, सचिन जाधव, अंतोन लोंढे, मच्छिंद्र दांगट, राज शेख, फरहान शेख, जुनेद बागवान, बाबासाहेब साळवे, फरिद सय्यद, फारुख शेख आदीसह रिक्षाचालक उपस्थित होते.



शहरातील प्रायव्हेट स्क्रॅप ऑटो रिक्षा कायमस्वरूपी बंद कराव्या या मागणीसाठी अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक–मालक संघटनेच्यावतीने वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहरामध्ये प्रायव्हेट स्क्रॅप रिक्षा याची कोठेही नोंद नसलेल्या आरटीओ ऑफिसमधील अधिकृत स्क्रॅप केलेल्या २ हजार ऑटोरिक्षा राजरोसपणे व्यवसाय करतात त्यामध्ये त्यांच्याकडे परवाना, लायसन, बॅच नाही बरेचसे गुन्हेगार लूट करणारे दारू पिऊन परवानाधारकांना मारहाण करणारे आहे. शासनाने आज मुक्त परवाना धोरण अवलंबलेले आहे. आज ५ हजार ५०० परवानाधारक ऑटो रिक्षा आहेत ते शासनाला १० हजार रुपये परवाना फी भरतात, इन्शुरन्स भरतात, पासिंग फी भरतात, लायसन बॅच काढतात आज नवीन ऑटो रिक्षाची किंमत ४ लाख रुपये आहे. स्क्रॅप रिक्षा ६ हजार रुपयांनी घेऊन तुकडे केलेल्या रिक्षा घेऊन जोडून रिपेअर करून राज रोज पणे व्यवसाय करतात मग परवानाधारक रिक्षा चालकांनी नवीन रिक्षा घेऊन सर्व नियमाचे पालन का करावे? आज परवानाधारक ऑटो रिक्षा चालकांचा व्यवसाय संपूर्णपणे उध्वस्त झालेला आहे. शासनाच्या पासिंग परवाना इतर फी भरणे मुश्किल झालेले आहे. मुलांच्या शिक्षणाचा खर्च घर खर्च भागवणे अवघड झालेले आहे असे असताना संबंधित सर्व अधिकाऱ्यांना निवेदन देऊन सक्षम भेटून वरील अधिकारी कुठल्याही प्रकारे कारवाई करत नाही स्क्रॅप प्रायव्हेट गाडी जप्त केल्यानंतर त्या गाड्या लावण्यासाठी जागा नाही म्हणून एक दुसऱ्याकडे बोट दाखवतात त्यांच्याकडे परवानाधारक ऑटो रिक्षावर कारवाई करण्यासाठी वेळ आहे पण स्क्रॅप व प्रायव्हेट रिक्षासाठी वेळ नाही ते फक्त परवानाधारक रिक्षावरच कारवाई करतात आज ७ हजार रिक्षांसाठी थांबे नाहीत या रिक्षा कोठे लावायच्या हा विचार करण्यास शासनाला वेळ नाही जर प्रायव्हेट स्क्रॅप रिक्षा बंद केले नाही व जो रिपेअर करून देतो जो व्यक्ती अशा रिक्षा चालवतो त्यांच्यावर येत्या आठ दिवसात कारवाई केली नाही तर नगर शहरातील सर्व परवाना ऑटो रिक्षा चालक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# जिल्ह्यात दुसऱ्या दिवशीही विजांसह वादळी पाऊस

*(पान १ वरुन)*

मान्सूनचा दमदार पाऊस झाला. शहरात वाऱ्याचा वेग जास्त असल्याने अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली होती. तसाच वादळी पाऊस सलग दुसऱ्या दिवशी १२ जून रोजी रात्री ८ च्या सुमारास जिल्ह्यात सर्वत्र कोसळला. या पावसामुळे शहराच्या अनेक भागातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. तसेच बहुतांशी भागात रात्रभर विजपुरवठा खंडित झाला होता.

### जिल्ह्यात तालुकानिहाय झालेला पाऊस

नगर १६.१ मिमी, पारनेर २८.८ मिमी, श्रीगोंदा ६ मिमी, कर्जत २.५ मिमी, जामखेड ५.३ मिमी, शेवगाव १८.२ मिमी, पाथर्डी १४.४ मिमी, नेवासा १७.५ मिमी, राहुरी ३१.३ मिमी, संगमनेर २५.५ मिमी, अकोले २३.३ मिमी, कोपरगाव ३०.६ मिमी, श्रीरामपूर २७.५ मिमी, राहाता २६ मिमी, जिल्ह्यात एकूण सरासरी पाऊस १८.६ मिमी.

### नगर शहर परिसरातील मंडलात झालेला पाऊस

नगरच्या नालेगाव मंडलात ५.३ मिमी पाऊस नोंदवला गेला आहे. याशिवाय सावेडी ३० मिमी, कापूरवाडी १७.५ मिमी, केडगाव १९.८ मिमी, भिंगार ११.८ मिमी, नागापूर १२.३ मिमी, जेऊर २०.३ मिमी, चिचोंडी पाटील ७ मिमी, वाळकी १० मिमी, चास १० मिमी, रुईछत्तीशी ६ मिमी, नेप्ती ४२.८ मिमी असा एकूण सरासरी १६.१ मिमी पाऊस झाला आहे.

### बैलगाडीवर झाड पडल्याने वृध्द महिलेचा मृत्यू

दरम्यान शेवगाव तालुक्याच्या काही भागात वादळी वाऱ्याने ११ जून रोजी सायंकाळी अक्षरशः थैमान घातले. जोरदार घोगावणाऱ्या वाऱ्याने व मुसळधार पावसामुळे तालुक्यातील घरे, पीकांचे मोठे नुकसान झाले. यावेळी अनेक झाडांच्या फांद्या मोडून पडल्या तर काही ठिकाणी मोठमोठी वृक्षच उन्मळून पडली. तालुक्यात मोठ्या प्रमाणात वीजेचे खांब पडल्याने वीज पुरवठा खंडित झाला. या वादळात दहिफळ येथे बैलगाडीवर झाड कोसळल्याने बैलगाडी असणाऱ्या एका वृध्द महिलेचा मृत्यू झाला, तर अन्य घटनेत तिघे जबर झाले आहेत. मिराबाई अशोक भोसले (वय ५७) असे मयत महिलेचे नाव आहे. तसेच ओंकार भोसले (वय १५), विराज भोसले (वय २०), मुक्ता भोसले (वय ३३) हे तिघे जखमी झाले आहेत. हे शेतकरी वादळी पाऊस सुरु झाल्याने शेतातून बैलगाडीत आपल्या घरी परतत असताना अचानक बैलगाडीवर झाड पडल्याने ही दुर्घटना घडली आहे.

# दि अंबिका महिला बँकेच्या अध्यक्षपदी सौ.सरोजिनी चव्हाण; उपाध्यक्षपदी ॲड.सौ.विजया काकडे यांची बिनविरोध निवड





नगर – दि. अंबिका महिला सहकारी बँकेची सभा श्रीमती शुभांगी गोंड, अध्यासी अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. सदर सभेत बँकेच्या अध्यक्षपदी सौ. सरोजिनी सुरेश चव्हाण तर उपाध्यक्षपदी संचालिका ॲड. सौ. विजया सुभाष काकडे यांची बिनविरोध निवड झाली. अध्यक्षपदाची सूचना ॲड. सौ. शारदा सुरेश लगड यांनी केली तर अनुमोदन सौ. शोभना संजय चव्हाण यांनी दिले. उपाध्यक्षपदाची सूचना संस्थापिका संचालिका प्रा. मेधा यशवंत काळे यांनी केली तर अनुमोदन सौ. भारती शशिकांत आठरे यांनी दिले.

अध्यासी अधिकारी श्रीमती शुभांगी गोंड यांनी खेळीमेळीच्या वातावरणात पदाधिकारी निवड झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. मावळत्या अध्यक्षा सौ. भारती शशिकांत आठरे सर्वांनी सहकार्य केल्याबद्दल आभार मानले.

नुतन अध्यक्षा व उपाध्यक्षा यांनी बँकेचा सध्याचा असलेला संमिश्र व्यवसाय रू. १९० कोटी वरून रू. २५० कोटी पर्यंत वाढविण्याचा आम्ही नक्कीच प्रयत्न करू. यामध्ये ग्राहक सेवा उचविण्याचा आमचा मानस असेल अशी उपस्थित सभेस ग्वाही देवून निवडी बद्दल सर्वांचे आभार मानले.

या प्रसंगी तालुका उपनिबंधक कार्यालयाचे अधिकारी संजय बनसोड, बँकेच्या संचालिका, मुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश गायकवाड हे उपस्थित होते.

## दत्तात्रय जक्का यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – बागडपट्टी येथील रहिवासी दत्तात्रय नारायण जक्का (वय ९०) यांचे १२ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते व्हिआरडीईतील सेवानिवृत्त टेक्निकल ऑफीसर होते. मिलिंद जक्का, नरेंद्र जक्का यांचे ते वडील होत.

## द्वारकाबाई कराळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – पोखर्डी येथील शेतकरी द्वारकाबाई बाळासाहेब कराळे (वय ८५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पती, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या परिसरात ताई या नावाने परिचित होत्या. वारकरी संप्रदायातील चांगदेव कराळे व नौदलातील सेवानिवृत्त अधिकारी सदाशिव कराळे यांच्या त्या मातोश्री होत. पोखर्डी येथील स्मशानभूमीत द्वारकाबाईंच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## सुमनबाई क्षीरसागर यांचे निधन



श्रीरामपूर – येथील सुमनबाई शिवराम क्षीरसागर (वय ७८) यांचे निधन झाले.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

बुवा हलवाईचे मालक केदार क्षीरसागर यांच्या मातोश्री, चंद्रकांत, दत्तात्रय, निलकंठ अभिजीत, उदय, जयंत क्षीरसागर यांच्या चुलती होत.



प्रभाग क्रमांक ११ हातमपुरा परिसर येथील कचरा उचलला जात नसल्याने अविनाश घुले यांच्या नेतृत्वखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# कचरा उचलला जात नसल्याच्या निषेधार्थ नागरिकांनी केले रास्ता रोको आंदोलन

नगर – प्रभाग क्रमांक ११ हातमपुरा मार्गे कोठीकडे येणाऱ्या रोडवर हनुमान मंदिर, दर्गा, चर्च अशी तीन धार्मिक स्थळे आहेत. मात्र परिसरात कचऱ्याची मोठी दुर्गंधी पसरली आहे. येथील गुलाबसिंह कंपाउंड परिसरात मनपाचे कर्मचारी चर्चच्या प्रवेशदारात कचरा जमा करतात, परंतु तो घेऊन जात नाही. या भागातील नागरिकांनी वेळोवेळी मनपास सांगून देखील त्याची कारवाई झाली नाही. अखेर माजी स्थायी समिती सभापती अविनाश घुले यांच्या मार्गदर्शनाखाली येथील नागरिकांनी रस्ता रोको आंदोलन केले. यावेळी प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी अविनाश घुले, रुपाली पारगे, रुपसिंग कदम, रवी ठोबरे, राजू साळवे, सत्यशील शिंदे, पहिली मंडळी चर्चचे रेव्ह. जनार्दन वाघमारे, सतीश मिसाळ, सम्युअल बोर्ड, प्रसन्ना शिंदे, राजेश सूर्यवंशी, प्रीतम जाधव, सुनील ढगे, जयेश खरात, हर्षल पाटोळे, राहुल थोरात, अमोल लोंढे, अनिल खरात आदी नागरिक उपस्थित होते.

यावेळी अविनाश घुले म्हणाले, जर या भागातील कचरा रोजच्या रोज उचलला नाही तर तो सर्व कचरा मनपामध्ये टाकण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. विशेष म्हणजे या भागात तीन धार्मिक ठिकाण असून एकीकडे शासकीय अधिकारी यांचे निवास्थान आहे. तरी सुद्धा मनपाला काहीच कसे वाटत नाही. एकीकडे मनपाला स्वच्छतेचे सर्व काही चांगले असल्याचे पारितोषके मिळवायची अन् दुसरीकडे कचऱ्याचे ढिग तसेच ठेवायचे, असेही ते म्हणाले.

# प्रभागरचना तयार करण्यासाठी मनपाकडून ७ सदस्यांची समिती

**१५ जुलैला प्रारूप तर २२ ऑगस्ट ते १ सप्टेंबर दरम्यान अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध होणार**

नगर – नगरविकास विभागाने बुधवारी प्रभाग रचना तयार करण्याचे आदेश दिल्यानंतर आता गुरुवारी प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार महापालिकेत आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यांची समिती नियुक्त करण्यात आली असून, समितीकडून कामकाज सुरू झाले आहे. निवडणूक आयोगाच्या मान्यतेनंतर १५ जुलैला प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यावर हरकती व सुनावणी होऊन २२ ऑगस्ट ते १ सप्टेंबर दरम्यान अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

प्रभाग रचनेसाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीत उपायुक्त, नगररचना विभागाच्या सहाय्यक संचालक, नगररचनाकार, संगणक तज्ज्ञ, जनगणना अधिकारी व नगररचना कर्मचारी आदींचा समावेश आहे. गुरुवारी समितीकडून प्रभाग रचना तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. जनगणनेचे प्रगणक गट, संगणकावर नकाशे तयार करणे, प्रभागांच्या हद्दी तपासून निश्चित करून प्रभागाच्या व्याप्तीसह सुमारे २४ दिवसात प्रारूप प्रभाग रचना तयार करण्यात येणार आहे.

निश्चित केलेल्या कार्यक्रमानुसार ४ जुलै रोजी प्रारूप प्रभाग रचनेचा मसुदा मान्यतेसाठी राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात येणार आहे. १५ जुलैला प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध झाल्यावर त्यावर २१ जुलैपर्यंत हरकती नोंदवता येणार आहेत. त्यावर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सुनावणी होऊन अंतिम प्रभाग रचना मंजुरीसाठी पुन्हा आयोगाकडे सादर होईल व आयोगाच्या मान्यतेनुसार १ सप्टेंबर पर्यंत अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

## बिडी कामगारांच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती

नगर – बिडी कामगारांच्या मुलांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी शिष्यवृत्ती प्रक्रिया सुरु झाली असून मॅट्रीकपूर्वसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ३१ ऑगस्ट तर मॅट्रीकोत्तरसाठी ३१ ऑक्टोबर २०२५ अशी असल्याचे बिडी कामगार दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी कळविले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### बैठे काम करत असाल तर

आजच्या काळात एक अशी सवय लोकांच्या जीवनाची शत्रू बनली आहे जी खूप सामान्य आहे आणि ती म्हणजे सतत बसण्याची सवय. जेव्हा तुम्ही बराच वेळ बसता तेव्हा तुमचे मोठे पोश्चरल स्नायू स्विच ऑफ मोडमध्ये जातात. ज्यामुळे अर्ध्या तासात तुमचा चयापचय ९०% कमी होतो. कमी स्नायूंच्या हालचालींमुळे ग्लुकोज बिघडतो, ज्यामुळे रक्तातील साखर वाढते आणि अस्वास्थ्यकर लिपिड प्रोफाइल होते. ही लक्षणे मेटाबॉलिक सिंड्रोमची लक्षणे आहेत, ज्यामुळे धमन्यांमध्ये प्लेक जमा होण्यास गती मिळते. यासाठी स्टँडिंग डेस्क वापरा किंवा बसण्याचे आणि उभे राहण्याचे संतुलन ठेवा. सहकाऱ्यांशी चर्चा करताना चालण्याची सवय लावा. गाडी दूर पार्क करा, सार्वजनिक वाहतुकीतून एक थांबा लवकर उतरा किंवा शक्य असेल तेव्हा सायकलने कामावर जा.

## पाककला

### बेसन बर्फी

**साहित्य :** १ कप बेसन, १/३ कप (६ टेबलस्पून) तूप, ३/४ कप साखर, ३/४ कप दूध, वेलचीपूड, ड्रायफ्रूट्स,

**कृती :** पॅनमध्ये बेसन चाळून घ्या, त्यात तूप घालून मंद आचेवर ब्राउन होईपर्यंत भाजा. आता त्यात साखर घालून मिक्स करा. नंतर थोडं थोडं दूध घालून मिक्स करा. मिश्रण पूर्णपणे आळले की वेलचीपूड, ड्रायफ्रूट्स घालावेत. टिनला तूप लावून त्यात हे मिश्रण ओता. सर्व बाजूने समान करून घ्या व त्यावर ड्रायफ्रूट्स घालून दाबून घ्या. सुरीने वड्या पाडा. सेट होण्यास अर्धा तास फ्रीजमध्ये ठेवा. वड्या सुट्या करून सजवा, तयार आहे बेसन बर्फी.

## वास्तू

### आर्थिक विपुलतेसाठी

* तुळशी वनस्पती विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित करणे, एकाग्रता वाढवणे, अभ्यासाशी संबंधित क्रियाकलाप आणि बौद्धिक क्षमता वाढवणे यासारख्या गोष्टींना मदत करतात.

* जेव्हा वास्तु मार्गदर्शक तत्त्वांनुसार मनी प्लांट, बांबू किंवा जेड लावले जाते तेव्हा असे मानले जाते की ही झाडे संपत्ती, आर्थिक वाढ आणि विपुलता आकर्षित करू शकतात.

## सल्ला

साधारण फ्रिजऐवजी ५ स्टार रेटेड फ्रिजची निवड केली तर विजेचे बील ३० टक्क्यांनी कमी होईल आणि पैसेही वाचतील.

## सौंदर्य

मुलतानी माती आणि गुलाब पाण्यात ऑलिव्ह ऑईल मिसळून बनवलेली पेस्ट चेहऱ्यावर दीड तास लावावी याने त्वचेचा कोरडेपणा दूर होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. १४ जून २०२५

**संकष्ट चतुर्थी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ कृष्णपक्ष, उ.षा.२४।२२, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कर्जाची परतफेड करण्यासाठी दिवस चांगला आहे. आर्थिक लाभ अधूनमधून होतील आणि खर्चही होत राहतील.

**वृषभ :** नोकरदारांना आज कामाच्या ठिकाणी समन्वय राखण्यासाठी संघर्ष करावा लागेल. अधिकारी विनाकारण नाराज होतील. वैवाहिक जीवनात काही चढ-उतार येऊ शकतात.

**मिथुन :** सामाजिक क्षेत्रात नावलौकिक मिळेल. तुमच्या मनात अनेक प्लॅन येतील पण वेळ किंवा पैशाच्या कमतरतेमुळे तुम्ही त्यांची अंमलबजावणी करू शकणार नाही.

**कर्क :** कष्ट करूनही आर्थिक लाभ कमी होईल. आज सरकारी किंवा जमिनीशी संबंधित कामात दिरंगाई केल्यामुळे ते दीर्घकाळ पुढे ढकलले जातील.

**सिंह :** सामाजिक क्षेत्रात नावलौकिक मिळेल. कामातील मंदी व आर्थिक समस्यांमुळे तुम्ही मानसिकदृष्ट्या अस्वस्थ राहाल. जोखमीच्या कामात गुंतवणूक केल्याने प्रथम तोटा होईल

**कन्या :** कौटुंबिक वातावरण पूर्वीपेक्षा चांगले राहील. आज तुम्ही घेतलेल्या निर्णयांमुळे तुमच्या प्रियजनांमध्ये नाराजी आणि द्वेषाची भावना निर्माण होऊ शकते. अनावश्यक खर्चामुळे आर्थिक समस्या निर्माण होतील.

**तूळ :** शेजाऱ्यांशी वादही होऊ शकतात. कोणतीही गंभीर परिस्थिती टाळण्यासाठी तुमची बुद्धिमत्ता सतर्क राहिल. आर्थिक कारणांमुळे प्रवास करावा लागेल.

**वृश्चिक :** घरातील वडीलधारी मंडळी आजच्या प्रतिकूल परिस्थितीत मदत करतील. वैवाहिक जीवनात सुसंवाद राहणार नाही. शिक्षकांचे किंवा वरिष्ठांचे आशीर्वाद घ्या.

**धनु :** गुंतवणुकीचा फायदा होईल. आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. मनातील कल्पना बऱ्याच अंशी पूर्ण होण्याची शक्यता आहे. खर्च कमी करण्यात तुम्ही यशस्वी व्हाल


**मकर :** तुम्ही दोन व्यक्तींमधील वादात मध्यस्थी करून योग्य निर्णय देऊ शकता यामुळे तुम्हाला सन्मान मिळेल. तुमच्या कल्पना देखील लोकांना आवडतील.

**कुंभ :** महिला पूजा कार्यात अधिक व्यस्त राहतील आणि त्यांच्या आरोग्याची देखील काळजी घेतील. उत्पन्नाचे नवे स्रोत उपलब्ध होतील. जोखमीच्या कामांमध्ये गुंतवणूक कराल.

**मीन :** रखडलेली महत्वाची कामे पूर्ण होतील आज तुम्ही आळस आणि निष्काळजीपणा सोडून काम केले तर यश मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७१९८ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) अमुक; फलाणा ३) नेहमी; हमेशा ६) नटूनथटून गावभर हिंडणारी स्त्री ७) आईची बहीण ९) गोडधोड करून खाण्याचा उत्साहाचा किंवा आनंदाचा दिवस १०) प्रत; प्रतिलेख; अनुकरण १३) अंत; अस्त; अखेर १५) येणे १७) मृत्यू; देहावसान १८) गलका; गोंधळ; गदारोळ २०) देह; कुडी; काया; तन २१) ओझे; वजन

**उभे शब्द :-** १) अंदाज; तर्क; कयास; अदमास २) कानाच्या व डोळ्याच्या मधली जागा ३) भरभर (झाडावर वगैरे चढणे) ४) पोते वगैरे शिवण्याची मोठी सुई ५) विरजलेल्या दुधातले पाणी काढून त्यात मीठ वगैरे घालून केलेले खाद्य ८) कर्नाटकातील एक समाज (माजी मुख्यमंत्री तथा माजी पंतप्रधान देवेगौडा त्याच समाजाचे आहेत) ११) विशेषत: लहान मुलांना होणारा एक आवाज १२) अग्नी १३) पागोट्याचा पदर १४) बाण सोडल्यानंतर धनुष्याच्या दोरीचा होणारा आवाज १५) गगन; नभ; अंबर १६) पाण्यात राहणारा एक हिंस्र प्राणी १९) अनेक केस किंवा तंतू यांचा समुदाय

**शब्दगंध क्र. ७१९७ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. ११९२ चे उत्तर**



# मुलांचे विश्व

संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : तुमचे मन तुम्हालाच जपायला यायला हवे, ते दुसऱ्याने जपावे अशी अपेक्षा ठेवणे चुकीचेच आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### जेनेरिक आणि ब्रँडेड औषधांमध्ये काय फरक आहे?

औषधे आता जवळजवळ प्रत्येक कुटुंबाचा भाग बनली आहे. बहुतेक कुटुंबांमध्ये, दररोज औषध घेणारा कोणीतरी असतो. औषधांच्या बाजारात, जेनेरिक औषधांबद्दल अधिक चर्चा होते. पण तुम्हाला माहिती आहे का ब्रँडेड औषधे आणि जेनेरिक औषधांमध्ये फरक काय आहे व जेनेरिक औषधे इतकी स्वस्त असण्याचे कारण काय आहे. चला तर जाणून घेऊ या....

बाजारात दोन वेगवेगळ्या प्रकारची औषधे उपलब्ध आहे. या दोघांमधील फरक जाणून घेण्यापूर्वी, औषधे कशी बनवली जातात हे जाणून घ्या. खरं तर, त्यात एक सूत्र आहे, ज्यामध्ये औषधे वेगवेगळी रसायने मिसळून बनवली जातात. जसे की जर कोणी वेदनाशामक औषध बनवत असेल तर ते औषध वापरलेल्या साहित्यापासून बनवले जाते. जर ते औषध एखाद्या मोठ्या कंपनीने बनवले असेल तर ते ब्रँडेड औषध बनते. यामध्ये, कंपनीचे नाव एकच असते, तर ते वेगवेगळ्या साहित्यापासून बनवले जाते, परंतु तुम्ही हे लक्षात घेतले असेल की औषधाच्या आवरणावर कंपनीचे नाव वरच्या बाजूला असते. तसेच जेव्हा एखादी छोटी कंपनी समान साहित्य मिसळून औषध बनवते, तेव्हा बाजारात ते जेनेरिक औषधे म्हणून ओळखले जाते. या दोन्ही औषधांमध्ये कोणताही फरक नाही, फक्त नाव आणि ब्रँडचा फरक आहे. औषधे सॉल्ट आणि मोलिक्यूल्स पासून बनवली जातात. म्हणून लक्षात ठेवा की औषधे खरेदी करताना, त्याच्या सॉल्टकडे नक्कीच लक्ष द्या. कोणत्याही कंपनीवर नाही, ज्याच्या नावाने औषधे विकली जातात. जेनेरिक औषधे फक्त जेनेरिक नावाने विकली जातात. ब्रँडेड आणि जेनेरिक औषधांमधील मोठा फरक म्हणजे प्रतिमा तयार करणे आणि विक्री वाढविण्यासाठी मार्केटिंग नियोजनाचा एक भाग आहे.

### संत मच्छिंद्रनाथ

एकदा रागाच्या भरात शिव कैलास आणि गौरी यांना सोडून एका निबिड जंगलात येऊन राहिले आणि त्यांनी तेथेच समाधी लावली. गौरीने शोध घेऊनसुद्धा शिव सापडले नाही. इतक्यात अचानक नारदमुनी तेथे आले. गौरीची व्यथा ऐकून त्यांनी अंतज्ञानाने शिवांचा शोध घेऊन त्यांचे बसण्याचे ठिकाण तिला सांगितले. गौरीने शिवांसमोर भिल्लिणीच्या वेषात जाऊन संगीतप्रधान नृत्याला सुरुवात केली.

त्या आवाजाने शिवांची समाधी उतरली. त्यांनी स्मित करत तिला विचारले, शाबरी, तू मला दिव्यसमाधीतून जागृत का केलेस ? तेव्हा शाबरी म्हणाली, आपण वर्षभर मला सोडून या समाधीवस्थेत कसे राहिलात, या गोष्टीचे मर्म मला जाणून घ्यायचे आहे. शिव म्हणाले, सांगेन; परंतु आता इथे नाही. जेथे मानवाची वस्ती नसेल आणि जेथे ते रहस्य कुणी ऐकणार नाही, अशा ठिकाणी मी ते तुला सांगीन. काही दिवस गेल्यावर गौरीने शिवांला त्या गोष्टीची आठवण करुन दिली. शिव तिला घेऊन निबिड जंगलात यमुनानदीच्या किनारी आले आणि ते समाधीचे गूढ तिला शाबरी भाषेत सांगू लागला; कारण शाबरी हीच गौरीची मातृभाषा होती.

त्याच वेळी यमुना नदीतील एका मत्स्यीने ब्रह्मतेज गिळले होते. कवी नारायणांनी त्या तेजात जीवरूपाने प्रवेश केला आणि तिचा गर्भ दिसामासी वाढू लागला. शिव सांगत असलेले गूढ मत्स्यीच्या पोटात असलेल्या मच्छिंद्रनाथांनी ऐकले. भगवान शंकराने आपल्या उपदेशाचे सार पार्वतीला विचारताच मच्छिंद्रनाथ मत्स्यीच्या पोटातून म्हणाले,

'सर्वत्र एक ब्रह्मच भरून राहिले आहे, हेच आपल्या उपदेशाचे सार आहे.'

हे वाक्य ऐकताच कवी नारायण मत्स्यीच्या पोटी जन्म घेणार असल्याचे शंकराने ताडले आणि त्यांना खूप आनंद झाला.

शिव म्हणाले, मच्छिंद्रा, तुम्ही पुढे बद्रिकाश्रमी आल्यावर याच मंत्राचा उपदेश मी दत्तात्रेयांच्या मुखातून तुम्हाला करवीन. मच्छिंद्रनाथांना आशीर्वाद देत त्यांनी त्यांना हठयोगाचा उपदेश केला आणि जीवब्रह्माची सेवा करण्यास सांगितले. त्यानंतर पूर्णमास भरताच मत्स्यीच्या उदरातून एका तेजस्वी बालकाचा जन्म झाला.

## जीवन का अमृत (भाग १)



ईमानदारी,मजबूती, साहस और दया, अनूठे सद्गुण हैं, जो कि आध्यात्मिक उन्नति में बहुत सहायक हो सकते हैं, अगर तुम इन्हें सही तरीके से अपनी जिंदगी में उतार लो। मुझे यह जानकर खुशी हुई कि आपने धूम्रपान की लत छोड़ दी है। खाने पीने के बताए गए परहेज का सख्ती से पालन पवित्र रास्ते पर लगातार तरक्की के लिए बहुत जरूरी है और इसको तोड़ना आपकी तरक्की में बाधा डाल सकता है। ये नियम कभी भी नहीं तोड़ने चाहिएँ, अपने मेहमानों के लिए भी नहीं।

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

सत्संग में जाना बहुत लाभकारी होता है। यहाँ शिष्य को पवित्र शिक्षाओं का सही अर्थ समझ में आता है और कार्यरत दयालु गुरु-शक्ति के प्रति प्रेम और भक्ति का विकास होता है। इसके अलावा, ऐसी पवित्र बैठक में आप गुरु-सत्ता से निकली प्रेम की तीव्र लहरों का आनंद उठाते हैं।

मैं दयालु गुरु-शक्ति के प्रति आपकी प्रेम, भक्ति और कृतज्ञता की भावनाओं की कद्र करता हूँ, जिसकी दया से आपको परा विद्या की पवित्र दीक्षा दी गई।

इंसान सृष्टि का सरताज है। जो प्रभु से प्रेम करते हैं, उन्हें सारी सृष्टि से प्रेम करना चाहिए। वह (प्रभु) हर शक्ल, हर सूरत में विद्यमान है। प्रकृति की हर वस्तु से आप कुछ न कुछ सीख सकते हैं। हम सभी जीवों के साथ भाईचारे और सौहार्द से रहें।

सभी ऋषि-मुनि और संत ब्रह्मांडीय एकता का दृष्टिकोण रखते थे और प्रकृति से प्रेम करते थे। गुरू नानक कहते हैं, जग सचे की है कोठरी, सचे का विच वास, यानि संपूर्ण सृष्टि प्रभु का घर है और वह इसमें रहता है।

आपको अपने कम भाग्यशाली भाई-बहनों के लिए सहायता और प्रेरणा का स्रोत बनना चाहिए। हो सकता है, आपके उदाहरण से उनका भाग्य सुधर जाए। कृपया ध्यान रखें आधी छटाक का अमल सौ मन कथनी से बेहतर है। संसार उपदेशों से ऊब चुका है और इंसानियत जीवन और प्रकाश (प्रभु के इजहार) को देखने के लिए बेचैन है। सत्गुरु के कहे अनुसार जीवन ढालकर आप प्रेम और समृद्धि के अग्रदूत हो सकते हैं। एक विकसित आत्मा बहुतों को फायदा पहुँचाएगी। रूहानियत सिखाई नहीं जा सकती, इसे तो एक संक्रामक रोग की तरह से पकड़ा जाता है और इसी प्रकार यह ग्रहणशील लोगों तक पहुँचती है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

यह शरीर और मानसिक क्रियाओं का मध्यस्थ स्थान है। यहां से संकेत सुषमना नाड़ी को जाते हैं। यह ग्रंथि सिराटोनिन व मैलाटोनिन हार्मोन का निर्माण करती है। यह सोने जागने तथा मौसमी गतिविधियों का नियमन करने वाले हार्मोन हैं। इन हार्मोन का उत्पाद अंधेरे में होता है, प्रकाश में अवरुद्ध हो जाता है। आस-पास के वातारण से प्राप्त प्रकाश से सीधे और आंखो के मार्ग द्वारा दोनों ही तरह से प्रतिक्रिया करती है। क्रोध, भय तथा प्रजनन का कार्य करती है। विचार इसी ग्रंथि में पैदा होते हैं। यही ग्रंथी आत्मा, परमात्मा और प्रकृति का मिलन स्थान है।

हिरण की नाभी में कस्तूरी होती है। ऐसे ही मनुष्य के अन्दर यह कस्तूरी है। जो कुछ हम हैं बस इसी के अन्दर सिमटा हुआ है। यह मनुष्य जीवन की हार्ड डिस्क है। इसके अन्दर संकल्प के रुप में साफ्टवेयर है। इस साफ्टवेर में अनलिमिटेड ५००० साल का डाटा है। जब हम बुकस पढ़ते हैं या योग लगाते हैं तो मन में एक सूक्ष्म पोइंटर से जुड़ जाते हैं अर्थात ऐसी एकाग्रता बन जाती है जिस से हम इसे पढ़ने लगते हैं।

पीनियल ग्रन्थि सारे शरीर की सरदार ग्रन्थि है। इस में आत्मा निवास करती है। इसे ही तीसरा नेत्र या आज्ञा चक्र या तिरकुटी कहते हैं। आत्मा का रुप अति सूक्ष्म है। आत्मा का रुप आकाश में चमकते सितारे के समान है, सफेद है। आत्मा सिर के बाल की नोक के दस हजारवें हिस्से के बराबर है। आत्मा को स्थूल आंखो से नहीं देख सकते। ये पांच तत्वों की पकड़ में नहीं आती। परंतु आत्मा के अन्दर एक विशाल समुन्द्र जितना फैलाव है। जैसे दस कविंटल रूई का विस्तार बहुत होता है परंतु विज्ञान की सहायता से उसका एक छोटा सा गठर बना दिया जाता है। ऐसे ही समुन्द्र जितनी विशाल आत्मा का ईश्वर ने बहुत छोटा सा रुप बना दिया है। मृत्यु के बाद मनुष्य का ११ ग्राम वजन कम हो जाता है। आत्मा अजर, अमर, अविनाशी है। आत्म भी एक तत्व हैं जिसे नष्ट नहीं किया जा सकता। आत्मा की शक्ति पदार्थ से अधिक है। विश्व में यह एक ही तत्व है जो देखता है, अनुभव करता है, प्रेम करता है, विचार करता है। क्रिया और प्रतिक्रिया करता है। आत्मा के मूल गुण शांति, प्रेम, सुख, आनंद एवं ज्ञान हैं। परंतु शरीर में आने के कारण हाथ, पैर, नाक, कान, मुख आदि के द्वारा आत्मा का बल संसार में फैलता रहता है। जिस से आत्मा काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार में फंस जाती है तथा दुःखी होती है। अगर हम आत्मा का बल जो बाहर बह रहा है उसे वापिस पीनियल ग्रंथि में ले आयें तो फिर से सुखी हो जायेगें। जब आत्मा इस ग्रंथि में केंद्रित हो जाती है तो सभी

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**दुकानदार** : मी तुम्हाला दुकानातल्या एकूण एक चपला दाखविल्या, आता दाखवायाला काही शिल्लक नाही

**महिला ग्राहक** : त्या समोरच्या डब्यात काय आहे ?

**दुकानदार** : मॅडम, थोडी तरी दया दाखवा.. त्यात माझे जेवण आहे

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* अर्जुन मेघवाल यांनी लोकसभेत सादर केलेले १२९ वे घटना दुरुस्ती विधेयक कशासंबंधीत आहे?

– एक देश एक निवडणुक

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### बालकांचे आजार

विश्वामध्ये जे लोक मोठे नाव करून गेले आहेत. शतकानुशतके ज्यांचे नाव लोकांच्या राहिले आहे अशा प्रतिभासंपन्न लोकांना त्यांच्या आई-वडिलांनीच घडविले आहे. त्यांना कर होस्टेलवर ठेवले नव्हते. या प्रतिभासंपन्न लोकांनी स्वत:च्या आयुष्याबरोबर इतरांचेही आय सुधारले. समाजासाठी चांगले कार्य केले आहे. आपल्याला आपला पाल्य जर असाच प्रतिभा घडवायचा असेल, तर पालकांनीच त्याचे पहिले गुरू व्हायला पाहिजे. तुला आठ वर्षांनी श्लोककडून त्याने दिवसभर शिस्तीत वागावे, अशी अपेक्षा धरणे चुकीचे वाटत नाही का? दिवसभा शाळेत शिक्षकांसमोर शिस्तीत राहिल्यानंतर घरी आल्यावर मुले दंगामस्ती करणारच ना! त्यांची वयच आहे दंगामस्ती करायचं. या वयात मस्ती नाही करणार तर काय मोठेपणी करणार का? फल तो सामान अस्ताव्यस्त फेकतो म्हणून त्याला लगेचच होस्टेलवर ठेवणे चुकीचे आहे. त्याला प्रेमाने जवळ घेऊन, 'श्लोक बाळा, चांगली मुले कपडे नेहमी जागेवर ठेवतात. तू गुड बॉय आहेस ना? मग सर्व वस्तू जागेवर ठेव बरं!' अशा सकारात्मक पद्धतीने त्याच्याशी बोलायला हवे.

शिवाजी महाराजांना घडविण्यात जिजाऊंचा जेवढा सहभाग आहे, तेवढाच शहाजी महाराजांचाही आहे. जिजाऊंनी प्रजेचे होत असेलेले हाल बघून शिवाजी महाराजांच्या मनात स्वराज्य स्थापन करण्याचे स्फुल्लिग निर्माण केले, तर शहाजी महाराजांनी बंगळूरवरून वेगवेगळ्या कलेमध्ये नैपुण्य मिळविलेल्या सरदारांना शिवाजी महाराजांना वेगवेगळ्या कला शिकविण्यासाठी पाठविले होते. घरापासून दूर कर्नाटकात राहूनही शहाजी महाराजांचे मुलाकडे लक्ष होते.

आईवडिलांमुळे शिवाजी महाराजांवर चांगले संस्कार होऊन त्यांनी पुढे प्रजेच्या हितासाठी स्वराज्याची स्थापना केली व स्वत:च्या आयुष्याबरोबरच अनेकांचे आयुष्य उजळले. स्वामी विवेकानंद लहान असताना त्यांच्या आईने त्यांना विचारले, बाळा, तू मोठेपणी कोण होणार आहेस?' त्या वेळी विवेकानंद भिंतीवरील फोटो बघून आईला म्हणाले, 'आई, मी मोठेपणी टांगेवाला होणार आहे.' जर आपल्या मुलाने आपल्याला असे उत्तर दिले, तर आपण पहिल्यांदा त्याला फटका मारला असता. कारण आपल्या डोक्यात मुलाने फक्त डॉक्टर, इंजिनीअर, संशोधक असेच काहीतरी बनावे, अशी संकल्पना असते आणि मुलाने असे उत्तर दिल्यावर त्याला फटका मारून 'आमच्या स्वप्नांचा तू चक्काचूर करणार आहेस' असे म्हणालो असतो.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



रावसाहेब शंकर काळे यांनी शिवसेनेत (शिंदे गट) कार्यकर्त्यांसह प्रवेश केला.

## सह्याद्री छावा संघटनेचे रावसाहेब काळे यांचा शिवसेनेत प्रवेश

नगर – सह्याद्री छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब शंकर काळे यांनी शिवसेनेत (शिंदे गट) कार्यकर्त्यांसह प्रवेश केला. शहरात नुकत्याच झालेल्या पदाधिकारी मेळाव्यात राज्याचे पर्यटन व सांस्कृतिक मंत्री तथा संपर्क मंत्री शंभूराज देसाई यांनी त्यांचे पक्षात स्वागत करुन सत्कार केला. यावेळी आमदार अमोल खताळ, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, बाबू टायरवाले, शहर प्रमुख सचिन जाधव, संभाजी कदम, दिलीप सातपुते, कमलाकर कोते, नितीन औताडे, नगर तालुका प्रमुख अजित दळवी, रामदास भोर, मनोहर पोटे, नंदकुमार ताडे, सागर बेग, माजी महापौर शिलाताई शिंदे, सुरेखा कदम, रोहिणीताई शेंडगे, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाप्रमुख किशोर वाघमारे, अनुसूचित जाती विभागाचे दक्षिण जिल्हाप्रमुख सुभाष आल्हाट आदी उपस्थित होते.

रावसाहेब काळे हे सह्याद्री छावा संघटना व धडक जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून जिल्ह्यात कार्यरत आहे. सर्वसामान्यांच्या विविध प्रश्नांवर आवाज उठवून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम करत आहे. कामगारांच्या न्याय, हक्कासाठी त्यांचा लढा सुरु आहे. जिल्ह्यात गाव तेथे शाखा सुरु करण्याचा संकल्प काळे यांनी व्यक्त केला असून, कामगारांना शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तर महापालिकेच्या निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा महापालिकेवर फडकविण्यासाठी सर्व कार्यकर्ते प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट केले.

# सुदृढ शहरासाठी फिटनेस पार्क गरजेचे

### विक्रम वर्मा यांचे प्रतिपादन

नगर – ज्या शहरातील नागरिक हे मनाने आणि शरीराने सुदृढ आणि निरोगी असतील ते शहर वेगाने प्रगती करते आणि अनेक नवनवीन उपक्रम करण्यात अग्रेसर होते असे मत मेजर जनरल विक्रम वर्मा यांनी व्यक्त केले.

आर्मड कोअर सेंटर सर्व्हिसेस (ACCS) आणि अ.नगर सायकलिंग क्लब यांच्या संयुक्त प्रयत्नातून विकसीत करण्यात आलेल्या फिटनेस पार्कच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सायकलिंग क्लबचे संस्थापक गौरव फिरोदिया, कर्नल समीर सरदना आणि लेफ्ट कर्नल माणिक त्रेहान यांची उपस्थिती होती.






आर्मड कोअर सेंटर सर्व्हिसेस (ACCS) आणि अ.नगर सायकलिंग क्लब यांच्या संयुक्त प्रयत्नातून विकसीत करण्यात आलेल्या फिटनेस पार्कच्या उद्घाटनप्रसंगी मेजर जनरल विक्रम वर्मा आदी. शेजारील छायाचित्रात या फिटनेस पार्कमध्ये बसविण्यात आलेले ओपन जिमचे साहित्य.

नगर शहरामध्ये गेल्या काही वर्षापासून शरीरस्वास्थाकडे तसेच व्यायामाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन तयार झाला आहे. आणि यासाठी अ.नगर सायकलिंग क्लबचा मोठा वाटा आहे. या फिटनेस पार्क मुळे नागरिकांना एक चांगली आरोग्यदायी सोय निर्माण झाली आहे ज्यासाठी अ.नगर सायकलिंग क्लबचे आम्ही आभारी आहोत असे मत मेजर जनरल विक्रम वर्मा यांनी व्यक्त केले

दरवर्षी आयोजीत होणाऱ्या विविध उपक्रमात मी एक स्पर्धक म्हणून सहभागी होतो. अ.नगर सायकलिंग क्लबचा प्रत्येक सदस्य हा सतत शहराचा आणि नागरिकांचा विचार करतो हे पुन्हा एकदा या फिटनेस पार्कमुळे सिद्ध झाले आहे, असे मत लेफ्टनंट कर्नल माणिक त्रेहान यांनी व्यक्त केले.

गौरव फिरोदिया म्हणाले की, आम्ही बऱ्याचदा या बाजुला सायकलिंग किंवा पळण्यासाठी येत असतो. आम्हाला काही गोष्टी जाणवल्या की इकडे येणाऱ्या लोकांना योगासाठी किंवा साध्या सोप्या व्यायामासाठी चांगली जागा किंवा साधने उपलब्ध नाहीत. म्हणून मग आम्हीच हे फिटनेस पार्क डेव्हलप करण्याचे ठरवले. या फिटनेस पार्कमध्ये ओपन जिम असून ज्यामध्ये १२ वेगवेगळे इक्विपमेंट्स आहेत. तसेच योगा करणाऱ्यांसाठी प्रशस्त जागा उपलब्ध आहे. हे फिटनेस पार्क सकाळी पाच ते रात्री दहा या कालावधीत सगळ्यांसाठी मोफत उपलब्ध असणार आहे. तरी सगळ्या नगरकरांनी या फिटनेस पार्क चा लाभ घ्यावा असे, आवाहन अ.नगर सायकलिंग क्लबच्या वतीने त्यांनी केले.

याप्रसंगी कर्नल समीर सरदना यांनी सुद्धा या फिटनेस पार्कला शुभेच्छा दिल्या.

नगर क्लबजवळ असणाऱ्या ब्लॅक एलिफेटच्या मागच्या बाजूस असणारे हे फिटनेस पार्क नगरकरांसाठी एक आरोग्यदायी पर्वणी ठरेल असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

# वटपौर्णिमेनिमित्त महिलांनी केली तुर व सोयाबीन बियाणांची पूजा

### शेतकऱ्यांना भरघोस उत्पन्न मिळावे वटपौर्णिमेनिमित्त प्रार्थना

नगर – मौजे विळद येथील खोपेश्वर महिला शेतकरी बचत गटातील महिलांनी वटपौर्णिमे– निमित्त वडाबरोबर बियाण्याची पुजा करत जन्मोजन्मी हाच पती मिळू दे या प्रार्थनेबरोबर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावून लहरी वातावरणापासून शेतकऱ्यांना सुरक्षित ठेवावे अशी प्रार्थना बचत गटातील महिलांनी यावेळी केली.



मौजे विळद येथील खोपेश्वर महिला शेतकरी बचत गटातील महिलांनी वटपौर्णिमेनिमित्त वडाबरोबर बियाण्याची पूजा केली. (छाया – समीर मन्यार)

कृषि विभागामार्फत तुर व सोयाबीन आंतरपिक प्रात्यक्षीक प्रकल्प राबवला जात आहे. प्रात्यक्षीकासाठी महाबीज मार्फत वेळेत बियाणे उपलब्ध झाले व मुहुर्त साधण्यासाठी खोपेश्वर महिला शेतकरी गटाने वडाबरोबर बियाणेचीही पुजा करण्याचे ठरवले.

यावेळी सहाय्यक कृषि अधिकारी कविता मदने यांनी बियाणे उगवण क्षमता चाचणी व बिजप्रक्रीया प्रात्यक्षीक करुन दाखवले.

जिल्ह्यात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुधाकर बोराळे व तालुका कृषि अधिकारी विकास पाटील यांचे मार्गदर्शनाखाली विविध पिकांचे प्रात्यक्षीक प्रकल्प महाडिबीटीवर नोंदणी केलेल्या शेतकरी गटांसाठी राबवले जात आहेत.

यावेळी मंडळ कृषि अधिकारी माधवी घोरपडे यांनी खरीप मोहीमा व लागवड तंत्रज्ञान विषयी माहिती दिली. उप कृषि अधिकारी विजय सोमवंशी यांनी फळबाग लागवड योजना, महाडीबीटी रजीस्ट्रेशन बाबत माहिती दिली.

यावेळी गटाचे अध्यक्षा वैशाली वाळके, सचिव अर्चना आडसुरे, सदस्य सुरेखा आंबेकर, कांताबाई कोळेकर, वैशाली गायकवाड, सिमा जगताप, पौर्णीमा पवार, सत्यशीला आडसुरे, रत्नमाला वाळके, उषा वाळके, प्रियंका निमसे व शेतकरी कल्याण आडसुरे, दिनकर शिंदे, अशोक वाळके, शेतमळा शेतकरी कंपनी अध्यक्ष दत्तात्रय जगताप, संचालक विजय पवार उपस्थित होते.

### कॉम्रेड भास्करराव जाधव स्मृती प्रतिष्ठानचे वतीने दरवर्षी देण्यात येणारा

## राज्यस्तरीय स्मृती अभिवादन पुरस्कार युवा साहित्यिक साहिल कबीर यांना जाहीर



नगर – कॉम्रेड भास्करराव जाधव स्मृती प्रतिष्ठानचे वतीने दरवर्षी देण्यात येणारा राज्यस्तरीय कॉम्रेड भास्करराव जाधव अभिवादन पुरस्कार यंदाचे वर्षे साहित्यिक कवी व लेखक साहिल कबीर (जिल्हा कोल्हापूर) यांना जाहीर करण्यात आल्याची माहिती लाल निशाण प्रकाशनाचे प्रमुख कॉम्रेड भीमराव बनसोड व कॉम्रेड भास्कर जाधव स्मृती प्रतिष्ठान च्या देण्यात आलेली आहे.

डाव्या चळवळीतील पूर्णवेळ कार्यकर्ते, लोकशाहीर, लेखक, कवी, पत्रकार, संपादक अशा विविध क्षेत्रातील लोकांना गेली पंधरा वर्षे हा पुरस्कार दिला जात आहे. रोख रक्कम, सन्मानचिन्ह पुस्तके व देऊन हा पुरस्कार दिला जातो. हा सोहळा दरवर्षी १८ जून रोजी केला जातो. यावेळी कॉम्रेड बनसोड यांचा चीन संबंधीचे बदलते विचार, नीलिमा बंडेलु यांचे अगापे, व रत्नमाला बनसोड यांचे मंथन या तीन पुस्तकांचे प्रकाशनही या कार्यक्रमात होणार आहे. यंदाचे वर्षे साहिल कबीर यांची सदर पुरस्कारासाठी निवड करताना खालील महत्त्वाच्या बाबी लक्षात घेण्यात आल्या.

साहिल हे समाजातील अल्पसंख्य, वंचित तसेच नाकारलेल्या समाजघटकांच्या जगण्यातील अगतीकता, कोंडमारा व त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा, शासनप्रशासनाचा दृष्टीकोन याचे यथार्थ चित्रण उभे करणारा तरूण लेखक म्हणून साहील कबीर ओळखले जातात.

विद्यापीठीय अभ्यासक्रमात त्यांच्या निवडक साहित्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

सदरील पुरस्कार सोहळा १८ जून रोजी संभाजीनगर या ठिकाणी होणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष नीलिमा बंडेलू व पदाधिकारी अभय जाधव व सुषमा अमर यांनी दिली आहे

# अहिल्यानगर येथे 'वॉल ऑफ ब्रेव्हहार्ट्स' शहीद स्मारकाचे अनावरण

### ट्विग फाउंडेशन, सोशल नगर, रोटरी डिग्निटी, कामत असोसिएट्स आणि सैनिक कल्याण कार्यालयाचा संयुक्त उपक्रम

नगर – भारताच्या स्वातंत्र्यापासून ते 'ऑपरेशन सिंदूर' पर्यंत, देशासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यातील ५१ शहीद सैनिकांना आदरांजली वाहण्यासाठी उभारण्यात आलेल्या 'वॉल ऑफ ब्रेव्हहार्ट्स' (शहीद स्मारक) स्मारकाचे अनावरण ११ जून रोजी सकाळी मेजर जनरल विक्रम वर्मा यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

शहीद जवानांच्या कुटुंबियांना सातत्याने पाठिंबा देण्याची भावना या स्मारकामागे आहे. असे स्क्वॉड्रन लीडर सागर कोरडे यांनी नमूद केले. या स्मारकाचा मुख्य उद्देश प्रत्येक नागरिकाला या शूरवीरांचा वारसा स्मरणात ठेवण्यास मदत करणे, तसेच युवकांना सेनेत सामील होण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे. असे रोटरी डिग्निटीचे अध्यक्ष डॉ. प्रसन्न देवचके यांनी नमूद केले.







अहिल्यानगर जिल्ह्यातील ५१ शहीद सैनिकांना आदरांजली वाहण्यासाठी उभारण्यात आलेल्या 'वॉल ऑफ ब्रेव्हहार्ट्स' (शहीद स्मारक) स्मारकाचे अनावरण मेजर जनरल विक्रम वर्मा यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी मेजर जनरल विक्रम वर्मा, सेना मेडल, विशिष्ट सेवा मेडल (कमांडंट आर्मड कोअर सेंटर अँड स्कूल) होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया होते. याप्रसंगी अन्य अतिथी म्हणून ब्रिगेडियर सुनील कुमार, सेना मेडल (स्टेशन कमांडर, स्टेशन मुख्यालय, अहिल्यानगर), पद्मश्री डॉ. पोपटराव पवार, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, स्क्वॉड्रन लीडर सागर कोरडे यांनी केले.

नव्याने उभारण्यात आलेल्या शहीद स्मारकावर पुष्प अर्पण करून आणि शहीदांना गार्ड ऑफ ऑनर देऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी श्रीमती अंबिका नारायण भोंडे या वीर पत्नीने आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितांना भावूक केले. वीर पत्नी, वीर माता आणि वीर पिता यांचा सन्मान करण्यात आला.

या प्रेरणादायी स्मारकाची निर्मिती अनेक महत्त्वाच्या व्यक्तींच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे. समाजहित जपणाऱ्या डॉ. अम्रिता देवचके, ट्विग फाऊंडेशनच्या संचालिका, यांनीही या प्रकल्पाला पाठबळ दिले. आणि प्रकल्प उभा राहण्यास प्रमुख भुमिका निभावली. ट्विग फाऊंडेशन सातत्याने समाजात सकारात्मक बदल घडवून आणते. ट्विग एक सोशल प्लॅटफॉर्म देखील आहे, ज्याद्वारे भारतीय सेनेचे शौर्य आणि कर्तृत्व लोकांपर्यंत पोहोचवले जाते. डॉ. प्रसन्न आणि डॉ. अम्रिता देवचके हे दोघेही लष्करी पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातून असल्याने, त्यांचे भारतीय सेनेवरील प्रेम या उपक्रमातून स्पष्टपणे दिसून येते.

या स्मारकाची मूळ संकल्पना 'सोशल नगर' चे अक्षय टेमकर यांची होती. अक्षय टेमकर यांनी संकल्पनेपासून ते स्मारक साकार होईपर्यंत प्रत्येक गोष्टीत वेळ आणि आर्थिक सहाय्य करून हा प्रकल्प अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष मेहनत घेतली. बांधकाम क्षेत्रात गेली एक दशक उत्कृष्ट कार्य करणारे कामत असोसिएट्सचे नंदन कामत यांनी 'वॉल ऑफ ब्रेव्हहार्ट्स'च्या निर्मितीमध्ये सहकार्य केले. नंदन कामत यांनी प्रत्येक गोष्टीत लक्ष घालून हा प्रकल्प सर्वोत्तम कसा होईल यासाठी परिश्रम घेतले.

डॉ. प्रसन्न देवचके, डॉ. अम्रिता देवचके, नंदन कामत, सागर कोरडे, आणि अक्षय टेमकर या सर्वांनी अथक परिश्रम घेऊन उभे केलेल्या या स्मारकामुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या इतिहासातील ५१ शूर सैनिकांचे योगदान नेहमीच स्मरणात राहील आणि भावी पिढ्यांना त्यातून देशाप्रती प्रेम आणि सेवेची प्रेरणा मिळेल. या कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त सैन्य अधिकारी, वरिष्ठ रोटेरियन, डॉक्टर्स व सी.ए. आदी उपस्थित होते.

# अहिल्यानगर येथील शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा कोल्हापुर येथील राज्य संमेलनात गौरव

नगर – अहिल्यानगर येथील शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा कोल्हापुर येथील राज्य संमेलनात गौरव करण्यात आला. यावेळी राज्य कार्यकारणी सदस्य रणजितसिंह परदेशी, जिल्हाध्यक्ष रोहित लोखंडे, उपशहरप्रमुख किरण झवेरी, शहर समन्वयक ओंकार फुलसौंदर, उपशहरप्रमुख विनायक बारटक्के आदींचा गौरव करण्यात आला.



अहिल्यानगरच्या शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा कोल्हापुर येथील संमेलनात गौरव करण्यात आला.

कोल्हापूर येथे पश्चिम महाराष्ट्र आरोग्य दूत वैद्यकिय सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अरोग्य सेवेत नि:स्वार्थीपणे काम केल्याबद्दल अहिल्यानगर येथील शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उद्योग मंत्री नामदार उदय सामंत, राज्य नियोजन मंडळ कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षिरसागर, आ.सुहास बाबर, उपमुख्यमंत्री वैद्यकिय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, राज्याध्यक्ष रामहरी राऊत, माजी आ.सुजित मीनचेकर, शिवसेना प्रवक्त्या ज्योति वाघमारे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले की, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाने गेल्या काही वर्षांमध्ये विशेषतः कोरोनाच्या कठीण काळात जो खंबीर आणि संवेदनशील प्रतिसाद दिला, तो उल्लेखनीय आहे. वैद्यकीय मदत म्हणजे केवळ औषधे किंवा उपचार पुरवणे नव्हे, तर गरजूंच्या पाठीशी उभं राहणं, त्यांच्या समस्यांना आपली समजून घेणं – हाच खरा शिवसेनेचा विचार आहे. आज आपण ज्या पदाधिकाऱ्यांचा गौरव करतो आहोत, त्यांनी कोणत्याही अपेक्षा न ठेवता, दिवस–रात्र रुग्णसेवेसाठी कार्य केले. गावोगाव, वाड्या–वस्त्यांमध्ये जाऊन मदतीचा हात दिला. ही सेवा म्हणजे आमच्या शिवसेनेच्या संस्कृतीचा भाग आहे. महाराष्ट्रात अशा कार्यकर्त्यांमुळेच शिवसेना ही जनतेच्या मनात आजही विश्वासाचं प्रतीक ठरते.

वैद्यकीय मदत कक्षाचे राज्याध्यक्ष रामहरी राऊत म्हणाले, शिवसेना हा पक्ष फक्त राजकारणासाठी नाही, तर समाजकारणासाठी आहे, हे आम्ही वारंवार सिद्ध केलं आहे. अहिल्यानगर येथील आमच्या वैद्यकीय मदत कक्षाच्या कार्यकर्त्यांनी समाजासाठी जे कार्य केलं आहे, ते केवळ एक जबाबदारी नव्हती, तर ती एक सेवा होती. कोरोना काळात जीव धोक्यात घालून लोकांपर्यंत पोहोचणं, औषधोपचार उपलब्ध करून देणं, ऑक्सिजन, अँब्युलन्स, रक्तदान अशा अनेक गोष्टींचं व्यवस्थापन करणं, ही एक फार मोठी जबाबदारी होती. पण आमचे कार्यकर्ते कुठेही डगमगले नाहीत. त्यांनी ही जबाबदारी अत्यंत तत्परतेने पार पाडली.आज त्यांचा झालेला सन्मान म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रातील शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या सेवाभावाचा सन्मान आहे. अशा कार्यकर्त्यांमुळेच आपली चळवळ मजबूत होते. मी या सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो आणि त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन इतरांनीही समाजसेवेत पुढे यावं, असं आवाहन करतो.

## इंडिया तायक्वांदो ओपन सिलेक्शन ट्रायल्स स्पर्धेमध्ये अहिल्यानगर येथील 'एकलव्य'च्या ३ खेळाडूंचा सहभाग

नगर – इंडिया तायक्वांदोच्या–वतीने ओपन सिलेक्शन ट्रायल्स ९ ते ११ जून रोजी विभागीय क्रीडा संकुल पंचवटी, नाशिक या ठिकाणी घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये एकलव्य तायक्वांदो अकॅडमीच्या वतीने ३ खेळाडूंनी सहभाग नोंदवाला. ७३ किलो वजन गटात सुवर्णपदकाचा मानकरी ठरला थानोजसाईरेड्डी किसरा तर, ४८ किलो वजन गटात विराज पिसाळ कांस्यपदकाचा मानकरी ठरला. ४९ किलो वजन गटात वनश्री लष्करे यांनी आपला सहभाग नोंदवला. या तीन खेळाडूंनी उत्तम खेळाचे प्रदर्शन करत यश संपादन केले.



इंडिया तायक्वांदोच्यावतीने ओपन सिलेक्शन ट्रायल्स स्पर्धेमध्ये एकलव्यच्या ३ खेळाडूंनी सहभाग घेतला.

थानोजसाईरेड्डी व विराज पिसाळ यांची एशियन युथ गेम साठी होणाऱ्या कॅम्पसाठी निवड झाली आहे. सदर कॅम्प स्पोर्टस् अथॉरिटी ऑफ इंडिया (SAI) च्या वतीने घेण्यात येणार आहे.

या स्पर्धेमध्ये संपूर्ण भारतातून तायक्वांदोचे खेळाडू सहभागी झाले होते. अहिल्यानगरचे एकलव्य तायक्वांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी सर्वांना आसमान दाखवत आपलं वर्चस्व कायम ठेवलं

या खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक गणेश वंजारे, योगेश बिचीतकर, सचिन मरकड, मंगेश आहेर व ग्रँड मास्टर अल्ताफ खान यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी खेळाडूंचा इंडिया तायक्वांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर व महाराष्ट्र तायक्वांदो असोसिएशनचे सचिव गफार पठाण, अॅड. गजेंद्र पिसाळ, प्रा. बालीरेड्डी, किसरा तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओंबसे, खजिनदार प्रसाद कुलकर्णी यांनी अभिनंदन केले व येणाऱ्या एशियन युथ गेम्ससाठी शुभेच्छा दिल्या.

तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष माणिकराव विधाते, तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे उपाध्यक्ष घनश्याम सानप, एकलव्य एकलव्य अकॅडमीचे अध्यक्ष दिलीप सातपुते यांनी खेळाडूंची अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# 'वृक्ष लागवड मोहीम' लोकचळवळ म्हणून राबवा

## 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' या अभियानांतर्गत जिल्ह्यात वृक्ष लागवडीचे सूक्ष्म नियोजन करा



जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया

नगर – राज्यात वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' या अभियानांतर्गत चालू वर्षात राज्यात १० कोटी वृक्ष लागवड मोहीम राबविण्याच्या शासनाने सूचना दिल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यात वृक्ष लागवड मोहिमेचे सूक्ष्म नियोजन करत ही मोहीम लोकचळवळ म्हणून राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात वृक्ष लागवडी संदर्भात आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. बैठकीस उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, विभागीय वन अधिकारी, सचिन कंद, पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, डॉ. एस.के.बांगर, जयहिंद फाऊंडेशनचे शिवाजी पालवे, शिवाजी गर्जे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, राष्ट्रीय वन नितीप्रमाणे एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्रावर वन आणि वृक्षाच्छादन असणे आवश्यक आहे. जागतिक तापमानातील वाढ, हवामान आणि ऋतूबदल याची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड हाती घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या वृक्ष लागवडीमध्ये जिल्ह्याचा सहभाग अधिक प्रमाणात रहावा, या दृष्टीने वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात यावे.

जिल्ह्यात शाळांच्या आवारामध्ये उपलब्ध जागेनुसार वृक्ष लागवड करावी. पाण्याच्या उपलब्धतेनुसार मियावाकीसारखे प्रयोग अंमलात आणावेत. बांधावर वृक्षे लावण्याबरोबरच तुतीची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात यावी. वृक्ष लागवडीच्या कामांमध्ये शहरी भागांमध्ये माजी सैनिकांचा सहभाग घेण्याबरोबरच एनजीओ, विविध सामाजिक संघटना तसेच सर्वसामान्यांनाही या उपक्रमामध्ये सहभागी करुन घेण्यात यावे. वृक्षांची केवळ लागवड न करता वृक्षांच्या संगोपन होण्यासाठी आवश्यक ते नियोजन करण्यात यावे. सामाजिक वनीकरण विभाग तसेच इतर नर्सरीमधून रोपे उपलब्धतेचे नियोजन करावे. वृक्ष लागवडीचे जिओटॅग छायाचित्र काढून ते वनविभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याच्या सुचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

उपवनसंरक्षक श्री. सालविठ्ठल म्हणाले, शासनामार्फत दरवर्षी ही मोहिम आयोजित करण्यात येणार आहे. वृक्ष लागवडीसाठी प्रत्येक विभागाने लागवडीचे क्षेत्र व रोपाचे नियोजन करावे. पावसाळा सुरु झाला असून वृक्षांची लागवड तातडीने करण्याची गरज आहे. वृक्ष लागवडीसदंर्भात तांत्रिक मदतीसाठी वनीकरण विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

बैठकीस संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# 'अंनिस'विषयी समाजमनात आदराची भावना

### राज्याध्यक्ष माधव बावगे



अंनिसचे जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद भारुळे यांच्या निवासस्थानी माधव बावगे यांचे प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अहिल्यानगर जिल्हा बैठक झाली.

नगर – सत्याची आणि वैचारिक–विवेकी विचारांची चळवळ असल्याने इतर कोणत्याही संघटनेपेक्षा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संघटनेबद्दल आणि कार्यकर्त्यांविषयी समाजमनामध्ये आदराची भावना आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे नवनिर्वाचित राज्याध्यक्ष माधव बावगे यांनी केले.

अहिल्यानगर येथे १२ जून रोजी दुपारी ३ वाजता जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद भारुळे यांच्या निवासस्थानी माधव बावगे यांचे प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अहिल्यानगर जिल्हा बैठक झाली, त्यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. राज्य सल्लागार कॉ.बाबा आरगडे, राज्य प्रधान सचिव डॉ.ठकसेन गोराणे, बुवाबाजी संघर्ष विभाग राज्य कार्यवाह ॲड. रंजना गवांदे, जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड, प्रमोद भारुळे, जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा व देवदत्त साळवे, निधी संकलन कार्यवाह प्रा. अशोक गवांदे, जिल्हा सोशल मीडिया कार्यवाह सुखदेव फुलारी, महिला सहभाग जिल्हा कार्यवाह छायाताई बंगाळ, बुवाबाजी संघर्ष विभाग जिल्हा कार्यवाह शशिकांत गायकवाड, संजय वाल्हेकर, अरविंद सोनटक्के, नगर शहराध्यक्ष भारतभुषण भागवत, शहर युवा कार्यकर्ता ललित भारुळे, शहर महिला विभाग कार्यवाह भावना भारुळे, गोरक्षनाथ रिंधे, संभाजीराव माळवदे आदि उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी माधव बावगे, डॉ. ठकसेन गोराणे, ॲड.रंजना गवांदे यांचेसह गौरव ग्रंथ प्रकाशनानिमित्त कॉ.बाबा आरगडे व सुखदेव फुलारी यांचा जिल्हा अंनिसच्यावतीने सत्कार करण्यात आला.

माधव बावगे पुढे म्हणाले की, नगर जिल्हा हा पूरोगामी परिवर्तनवादी विचारसरणीचा जिल्हा आहे, या जिल्ह्यात संघर्षातून संघटना तयार झालेली आहे. अंनिस ही कृतीशील, विवेक विचारांची पेरणी करणारी आहे. आजकाल लोकांना काय बरं वाटतं यासाठी आपले विचार सोडून खरं बोलण्यापेक्षा बरं बोलण्याची सवय लागलेली आहे. अंनिस ही देवाधर्माच्या विरोधातील चळवळ नाही. तर याबाबत भारतीय राज्य घटनेत जे नमूद आहे त्याला अनुसरून, तटस्थतेची भूमिका घेऊन, सामाजिक परिवर्तनाचे काम करणारी संघटना आहे. शोषण, फसवणूक व दिशाभूल करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध करणे, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार, प्रसार व अंगीकार करणे, धर्माची विधायक, कृतिशील, कालसुसंगत चिकित्सा करणे, संत समाज सुधारकांचा वारसा व संविधानाचा मूल्याशय कृतिशील करणे आणि व्यापक समाज परिवर्तनाच्या चळवळीशी जोडून घेणे या पंचसूत्रीवर संघटना काम करते.

शाखा कार्यकारिणी, जिल्हा कार्यकारिणी व राज्यस्तर अशी अंनिसची संघटनात्मक संरचना आहे. शाखा सक्षम होण्यासाठी शाखांच्या नियमित बैठका घ्याव्यात, सभासद नोंदणी करावी, शाखा वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, वैचारिक पुस्तकांचे वाचन करून आपली वैचारिक बैठक पक्की करावी आणि चिकित्सक वृत्ती बाळगावी अशी अपेक्षा बावगे यांनी व्यक्त केली.

डॉ.ठकसेन गोराणे म्हणाले की, कॉम्रेड बाबा आरगडे गौरव ग्रंथामधून आपल्या कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळेल. अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये काम करण्यास मोठी संधी आहे. काम सुरूच आहे, परंतु वेग वाढवण्याची गरज आहे. जिल्हा पदाधिकाऱ्यांनी शाखा भेटी द्याव्यात. कार्यकर्त्यांना आपल्या जबाबदाऱ्या आणि मर्यादा काय आहेत हे माहिती व्हावे, विवेकी विचारांचे वारस तयार व्हावेत यासाठी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीरे आयोजित करणे आवश्यक आहेत. राज्य संघटनेच्या माध्यमातून जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी कार्यकर्ता प्रशिक्षण केंद्र उभी करण्याचा मानस आहे.

ॲड. रंजना गवांदे म्हणाल्या, अहिल्यानगर जिल्हा शाखेचे कार्य उत्तम आहे. एकमेकांना ताकद–प्रोत्साहन देत जिल्ह्याचे काम सर्वांच्या सहकार्याने आणखी पुढे नेऊ.

कार्यकर्त्यांनी वैचारिक पुस्तकांचे वाचन करावे, स्वत:करिता नियमावली तयार करावी, असे कॉ.बाबा आरगडे यांनी सूचविले.

यावेळी नगर जिल्हा, नगर शहर, संगमनेर, नेवासा, भेंडा, श्रीरामपूर, पाथर्डी, कान्हुर पठार शाख़ेंच्या पदाधिकाऱ्यांनी आपापल्या शाखेचा अहवाल सादर केला.

# महाराष्ट्र सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे बीसीए/बीबीए प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज सुरू



डॉ. बाळासाहेब सागडे

नगर – महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (CET Cell) मार्फत घेण्यात येणाऱ्या BCA (Bachelor of Computer Applications) आणि BBA (Bachelor of Business Administration) या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी केले आहे.

प्राचार्य डॉ. सागडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, BCA प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज १२ जूनपासून सुरू झाले असून, २० जून ही अर्ज करण्याची अंतिम मुदत आहे. विद्यार्थ्यांना cetcell.mahacet.org या अधिकृत वेबसाइटवर जाऊन आपला ऑनलाइन अर्ज भरता येणार आहे.

या प्रवेश परीक्षांच्या माध्यमातून मिळणारे गुण हे BCA आणि BBA अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी महत्त्वाचे ठरतील. प्रवेश अर्ज आणि प्रक्रियेसाठी महाविद्यालयात संपर्क साधा. प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रिया आणि संबंधित माहिती अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी प्राचार्य डॉ. सागडे यांनी विद्यार्थ्यांना न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयाच्या BCA/BBA विभागाला समक्ष भेट देण्याचे आवाहन केले आहे. महाविद्यालयातील अनुभवी कर्मचारी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करतील.

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी, न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयाच्या BCA विभागात (CASAS प्रशासकीय इमारत येथे) मोफत प्रवेश अर्ज भरण्याची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी खालील क्रमांकांवर संपर्क साधू शकतात: ९५७९७९३६६१, ८७८–८२३१६६१

विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता, लवकरात लवकर अर्ज भरून आपल्या उच्च शिक्षणाच्या दिशेने पहिले पाऊल टाकावे, असे आवाहन न्यू आर्टस् महाविद्यालयाने केले आहे.

# बीबीए/बीसीए प्रवेशास इच्छुक विद्यार्थ्यांसाठी आय.एम.एस.मध्ये मार्गदर्शन केंद्राची स्थापना

नगर – बीबीए/बीसीए प्रवेशासाठी इच्छुक असलेले विद्यार्थी ज्यांनी मागे झालेली सीईटी दिलेली नाही अशांसाठी पुन्हा एकदा प्रवेशासाठी सुवर्णसंधी आलेली आहे. सीईटी सेलतर्फे पुन्हा एका प्रवेश परीक्षेची घोषणा करण्यात आली आहे. या सीईटी परीक्षेसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशनची मुदत १२ ते २० जुनपर्यंत देण्यात आली आहे.

यासंदर्भात विद्यार्थ्यांना ऑनलाईन रजिस्ट्रेशनसाठी मार्गदर्शन केंद्राची स्थापना आय.एम.एस.सी. डी.आर., स्टेशन रोड येथे करण्यात आली आहे. तरी संबंधित विद्यार्थ्यांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशनची बिनचुक प्रक्रिया करण्यासाठी सर्व कागदपत्रांसहित आय. एम. एस. मार्गदर्शन केंद्राला भेट द्यावी, असे आवाहन संचालक डॉ. एम. बी. मेहता व उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी केले आहे.

तसेच यासंदर्भात कोणतीही माहिती हवी असल्यास विद्यार्थ्यांनी बीसीएकरीता डॉ. सय्यद मुदस्सर (९८२३१००७५६) व बीबीएकरीता डॉ. हर्षवर्धन भावसार (९९६०४५९६४७) यांच्याशी संपर्क साधावा.

# अर्बन बँक प्रकरणातील आरोपी रुपेश भन्साळी यांना जामीन मंजूर

नगर – नगर अर्बन बँक घोटाळा प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने अटक केलेल्या पुण्यातील बांधकाम व्यावसायिक रुपेश सूर्यकांत भन्साळी यांना बुधवारी विशेष न्यायाधीश एम.एच.शेख यांनी आरोपीला जामीन मंजूर केला आहे.

या प्रकरणी सुनावणी करताना न्यायाधीश एम.एच. शेख यांनी आदेश देताना ऑर्डरमध्ये नमूद केले आहे कि, आरोपीला अटक केलेल्या पोलिस अधिकाऱ्यांनी आरोपीस २४ तासाच्या आत न्यायालयात हजर करणे आवश्यक होते. पण त्यासाठी ३० तास एव्हढा अवधी घेतला. त्यामुळे अर्जदाराची अटक बेकायदेशीर आहे आणि कायद्याच्या आदेशाविरुद्ध आहे. हे भारतीय संविधानाच्या कलम २२(२) चे उल्लंघन आहे. अर्जदाराला २४ तासांच्या निर्धारित कालावधीत जवळच्या दंडाधिकाऱ्यांसमोर हजर न करता कोठडीत ठेवणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे आणि ते भारतीय संविधानाच्या कलम २२(२) अंतर्गत मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे. २४ तासांच्या बेकायदेशीर कोठडीनंतर अर्जदाराची अटक नष्ट होते. हे भारतीय संविधानाच्या कलम २२(२) अंतर्गत आरोपीच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे. त्यामुळे आरोपीला जामिनावर सोडणे हे न्यायालयाचे कर्तव्य आहे. म्हणूनच अर्जदार जामिनासाठी पात्र आहे, असा आदेश देत आरोपी रुपेश भन्साळी यांना जामीन मंजूर केला आहे.

यावेळी आरोपी रुपेश भन्साळी यांच्या वतीने ॲड. पृथ्वीराज डापसे व ॲड.सेऊल शहा यांनी युक्तिवाद केले. त्यांना ॲड.मुस्कान सय्यद, ॲड.श्रीकांत ताके व तेजस कोल्हे यांनी सहकार्य केले.



जंगूभाई तालीम ट्रस्टच्या वतीने आयोजित उपक्रमात, अनाम प्रेम संस्था येथील दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

# दिव्यांग व्यक्ती हा समाजातील एक संघर्षशील घटक

### ॲड. धनंजय जाधव यांचे प्रतिपादन

नगर – दिव्यांग व्यक्ती हा समाजातील एक संघर्षशील घटक आहे. आपल्या जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर ते अनेक वेळा अशक्य वाटणाऱ्या उंची गाठतात. त्यांच्या प्रगतीसाठी आपण सर्वांनी एक पाऊल पुढे टाकले पाहिजे, अशा भावनिक आणि प्रेरणादायी भावना ॲड. धनंजय जाधव यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त व्यक्त केल्या. जंगूभाई तालीम ट्रस्टच्या वतीने आयोजित या विशेष उपक्रमात, अनाम प्रेम संस्था येथील दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. हा उपक्रम सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेऊन करण्यात आला असून, उत्सव, वाढदिवस अशा प्रसंगी समाजोपयोगी कार्य घडावे हीच आपली खरी संस्कृती असल्याचे प्रतिपादन ॲड. जाधव यांनी यावेळी केले.

या उपक्रमात शालेय साहित्याचे वाटप मितेश शहा, तेजस कथडे, पवन गुंदेचा, सचिन डुंगरवाल, विश्वजीत बोरा यांच्यावतीने करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी रोहन सानप, सिद्धार्थ मुथियान, राहुल मुथा, आदिनाथ जाधव, सोमनाथ जाधव, योगेश साबळे, प्रशांत दारकुंडे, साहिल ओस्तवाल, धनेश खत्ती, शिवदत्त पांढरे, पुरुषोत्तम सब्बन, ज्ञानेश्वर दौंडकर, स्वप्निल अंकम, राहुल गोंधळे आदी उपस्थित होते.

यावेळी धनंजय जाधव म्हणाले की, समाजामध्ये वावरताना आपण समाजाची काही देणे लागतो या भावनेतून प्रत्येकाने काही ना काही समाजोपयोगी कार्य केले पाहिजे. केवळ स्वतःच्या आनंदासाठी नाही, तर दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू आणण्यासाठी आपण सण–उत्सव व वाढदिवस साजरे करावेत. सदर उपक्रमाच्या माध्यमातून समाजात सकारात्मकतेचा संदेश पोहोचवण्याचा आणि दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास जागवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# दुचाकी संवर्गातील नवीन वाहनांकरिता नवीन वाहन क्रमांक मालिका सुरू

नगर – दुचाकी संवर्गातील नवीन वाहनांकरिता नवीन वाहन क्रमांक मालिका सुरू करण्यात येत असून इच्छुक अर्जदारांनी १६ व १७ जून रोजी सकाळी १० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत पसंती क्रमांकाच्या विहित शुल्काच्या धनादेशासह अर्ज रोखपाल विभागाच्या खिडकी क्रमांक १४ वर जमा करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

अर्ज सादर करताना वाहन मालकाच्या नावाचा अर्ज असावा. अर्जासोबत पत्त्याचा पुरावा, पॅनकार्ड, आधारकार्ड व त्यास संलग्न भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. पसंती क्रमांकाचा धनादेश 'अहिल्यानगर कँप शाखा / ट्रेझरी शाखा (कोड क्र. १३२९६)' यांच्यासाठी देय असावा.

एका पसंती क्रमांकासाठी एकच अर्ज प्राप्त झाल्यास त्याचा विचार केला जाईल. परंतु, एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास अशा अर्जांची यादी १७ जून रोजी सायंकाळी ४.३० वाजता कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध केली जाईल.

ज्या पसंती क्रमांकासाठी एकाहून अधिक अर्ज आलेले असतील, त्यांच्यासाठी अर्जदारांनी १८ जून रोजी दुपारी १.३० वाजेपर्यंत पसंती क्रमांक शुल्काच्या धनादेशाव्यतिरिक्त जादा रकमेचा धनादेश बंद लिफाफ्यात सिलबंद स्वरूपात खिडकी क्रमांक १४ वर सादर करावा. त्यानंतर हे अर्जदार १८ जून रोजी दुपारी ३ वाजता सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या दालनात उपस्थित राहावेत.

लिलावासाठी अर्जदार किंवा त्यांचा प्रतिनिधी ओळखपत्र व प्राधिकारपत्रासह उपस्थित राहणे आवश्यक आहे. ज्या अर्जदाराने सर्वाधिक रकमेचा धनादेश सादर केला असेल, त्याला संबंधित पसंती क्रमांक देण्यात येईल. उर्वरित अर्जदारांचे धनादेश त्यांना परत करण्यात येतील.

विहित वेळेत अनुपस्थित राहिलेल्या अर्जदारांचा कोणताही विचार केला जाणार नाही. तसेच पसंती क्रमांकासाठी कोणत्याही अर्जदारास दूरध्वनी, भ्रमणध्वनी किंवा संदेशाद्वारे (एसएमएस) संपर्क केला जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# राठोड परिवाराला आर्थिक सहाय्य करून राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपली

### डॉ.बाळासाहेब सागडे यांचे प्रतिपादन



न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या १९९५ ते २००० या सालातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माजी विद्यार्थ्यांनी दिवंगत मित्र राजेशकुमार बन्सीलाल राठोड यांच्या परिवाराला एक लाख दहा हजार रुपयांचा धनादेश देऊन आर्थिक सहाय्य केले.

नगर – देश सेवा करण्याच्या हेतूने राष्ट्रीय सेवा योजनेत कै.राजेशकुमार राठोड यांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या आकस्मिक निधनाने सर्वांना मोठा धक्का बसला आहे. त्यांचे राहिलेल्या अपुर्ण स्वप्न त्यांचे मुले पूर्ण करतील. तीस वर्षे होऊन देखील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माजी विद्यार्थ्यांचा मित्रपरिवार आजही एकमेकांच्या दुःखात सहभागी होत आहे. प्रा. रोहिदास कोल्हे व प्रा.मचे यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे आजही एनएसएसच्या माजी विद्यार्थ्यांचा मित्रपरिवार कार्यरत आहे. राठोड परिवाराला आर्थिक सहाय्य करून राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. राठोड परिवाराला न्यू आर्टस् कॉमर्स कॉलेजच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे प्रतिपादन न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब सागडे यांनी केले आहे.

न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजच्या १९९५ ते २००० या सालातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माजी विद्यार्थ्यांनी दिवंगत मित्र राजेशकुमार बन्सीलाल राठोड यांच्या परिवाराला एक लाख दहा हजार रुपयांचा धनादेश देऊन आर्थिक सहाय्य केले. तसेच कै. राठोड यांच्या स्मृती जपण्यासाठी न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी डॉ.बाळासाहेब सागडे, माजी प्राचार्य डॉ.भास्करराव झावरे, प्रा.रोहिदास कोल्हे, कार्यक्रमाधिकारी प्रा.गणेश निमसे, प्रा. हरिभाऊ मचे, राठोड परिवाराचे चंद्रकला राठोड (आई), अंजना राठोड (पत्नी), ऋतुप्रिया राठोड (मुलगी), बबनराव राठोड (चुलते), राष्ट्रीय सेवा योजनेचे (एन एस एस) माजी विद्यार्थी जयप्रकाश पाटील, विवेक अकोलकर, रोहिणी काकडे, योगेश एखे, योगेश धामणे, अर्जुन बोडखे, किरण आव्हाड, किरण मोडवे, महावीर नारळे, गोवर्धन पांडुळे, अमोल भांबरकर आदींसह राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ.भास्करराव झावरे म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माजी विद्यार्थ्यांनी राठोड परिवाराला आर्थिक सहाय्य करून सामाजिक बांधिलकी जपली आहे. महाविद्यालयाने केलेले संस्कार व राष्ट्रीय सेवा योजनेतून मिळालेले संस्कार आजही राष्ट्रीय सेवा योजनेच्या माजी विद्यार्थ्यांमध्ये संवेदना टिकून आहेत.

प्रा.रोहिदास कोल्हे म्हणाले, कै.राजकुमार राठोड याने ३० वर्षांपूर्वी राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी होऊन राष्ट्रहितासाठी कार्य केले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रत्येक कार्यक्रमासाठी राठोड हा बीड जिल्ह्यातून येऊन सहभागी होत असे. तसेच महिला कॉलेजचे प्राचार्य म्हणून ज्ञानदानाचे कार्य राठोड यांनी केले आहे. त्यांच्या अपघाती निधनाने सर्व एनएसएसचे माजी विद्यार्थी व राठोड परिवार यांना दुःख झाले आहे. आजही नगर शहरात राष्ट्रीय सेवा योजनेचा मोठा मित्रपरिवार राठोड कुटुंबाच्या पाठीशी आहे.

या कार्यक्रमात प्रा.गणेश निमसे, सुदर्शन निकम, जयप्रकाश पाटील, बाळासाहेब धामणे, कांता बोठे, वसंत शिंदे आदींनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक अकोलकर यांनी केले. रोहिणी काकडे यांनी आभार मानले.

कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे आजी माजी विद्यार्थी उपस्थित होते.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## लघुग्रहांची धडक रोखता येणार?




६ कोटी ६० लाख वर्षांपूर्वी पृथ्वीला एका मोठ्या आकाराच्या लघुग्रहाची धडक झाली. या धडकेमुळे निर्माण झालेले विवर आजही मेक्सिकोमध्ये 'चिक्सुलुब क्रेटर' या नावाने पाहायला मिळते. या लघुग्रहाच्या धडकेमुळेच पृथ्वीवरून डायनासोरचे साम्राज्य नष्ट झाले होते. काळाच्या ओघात पृथ्वीला अशा अनेक लघुग्रहांच्या, मोठ्या उल्कांच्या धडकेचा सामना करावा लागलेला आहे. त्यामुळे पृथ्वीच्या मार्गात येणाऱ्या अशा लघुग्रहांची धडक कशी टाळावी याबाबतही आधुनिक काळात विचार करण्यात येत आहे. त्यामधूनच डार्ट मोहीमही राबवण्यात आली होती व 'डार्ट' यानाची डिमोर्फोसला धडक घडवून या लघुग्रहाची दिशा बदलण्याचा यशस्वी प्रयोगही करण्यात आला होता. आता 'नासा'ने याबाबत आणखी विचार करून लघुग्रहांच्या संभाव्य धडक रोखण्यासाठी योजना तयार केलेली आहे.

'टीओआय'च्या रिपोर्टनुसार, 'नासा'च्या रणनीतीमध्ये 'निअर अर्थ ऑब्जेक्ट' (एनईओ) च्या धोक्यांपासून बचाव करण्यासाठी एक बहुआयामी दृष्टिकोन ठेवण्यात आलेला आहे. निकटच्या भविष्यात पृथ्वीला कोणत्याही लघुग्रहाचा धोका नाही. मात्र तरीही 'नासा' यादृष्टीने तयारी करीत आहे, जेणेकरून संभाव्य धोका टाळला जाऊ शकेल. रिपोर्टनुसार, 'नासा'च्या योजनेत पृथ्वीच्या दिशेने येत असलेल्या लघुग्र हाला रोखण्यासाठी किंवा त्याची दिशा बदलण्यासाठी अंतराळयानांची '१००० आर्मी' पाठवण्याची योजनाही समाविष्ट आहे. यापेक्षाही मोठा धोका असेल तर आण्विक उपकरणे वापरण्याचाही पर्याय आहे.

१९९८ च्या 'आर्मगेडन' या चित्रपटात दाखवल्याप्रमाणेच हा उपाय असेल. त्यामध्ये पृथ्वीच्या दिशेने येणाऱ्या लघुग्रहाला नष्ट करण्यासाठी एका आण्विक उपकरणाचा वापर करण्यात आल्याचे दाखवलेले आहे. 'नासा'ने २०२२ मध्ये 'डबल ॲस्टेरॉईड रीडायरेक्शन टेस्ट' म्हणजेच 'डार्ट' मोहीम यशस्वीरित्या राबवली होती. ही 'डार्ट' मोहीम आता 'नासा'च्या संरक्षणात्मक संभाव्य मोहिमेत पहिल्या श्रेणीत असेल. जर ऐनवेळी एखाद्या धोकादायक लघुग्रहाचा छडा लागला तर त्याला निपटण्यासाठी आण्विक विस्फोटकांचा पर्याय निवडला जाऊ शकतो. असा अणुस्फोट लघुग्रहाला नष्ट करू शकतो किंवा त्याची दिशा बदलवू शकतो. लघुग्रह या अशा अवकाशीय शिळा आहेत ज्या इतस्तः भटकत असतात. मंगळ आणि गुरु या दोन ग्रहांदरम्यान अशा अवकाशीय शिळांचा 'ॲस्टेरॉईड बेल्ट' नावाचा एक पट्टाच आहे. याशिवाय आपल्या सौरमालिकेच्या टोकापाशी नेपच्यूनच्या पुढेही असे अनेक लघुग्रह आहेत.

## कृत्रिम प्रकाश संश्लेषणाबाबत जीवाणूंना प्रशिक्षण!


सूर्यप्रकाश, हवा व पाणी यांच्या सहाय्याने वनस्पती पानांचा वापर करून प्रकाशसंश्लेषणाची क्रिया करतात. त्यामधून त्यांना ऊर्जा मिळत असते. वैज्ञानिकांनी कृत्रिम प्रकाशसंश्लेषणासाठी जीवाणूंना प्रशिक्षण देण्याचेही संशोधन केले असून त्यामुळे आगामी काळात सौरऊर्जेचे रासायनिक ऊर्जेत रूपांतर करणारे तंत्रज्ञान तयार करता येईल. या प्रयोगात मूरेला थर्मोॲसेटिका नावाच्या जीवाणूंचा वापर अर्धवाहक नॅनो कणांच्या मदतीने संकरित व कृत्रिम प्रकाशसंश्लेषणासाठी करण्यात आला. त्यात सूर्यप्रकाशातील ऊर्जेचे रूपांतर रासायनिक उत्पादनात म्हणजेच रासायनिक ऊर्जेत करण्यात आले आहे. कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या लॉरेन्स बर्कले राष्ट्रीय प्रयोगशाळेत पिडॉंग यांग यांनी हा प्रयोग केला असून त्यांनी सांगितले की, एम थर्मोॲसेटिका या जीवाणूंचे गुणधर्म प्रकाशसंश्लेषणास अनुकूल नसतानाही त्यांच्यात कॅडमियम सल्फाईड नॅनो कण मिसळून कार्बन डायॉक्साईडपासून ॲसेटिक ॲसिड तयार करण्यात आले.




नैसर्गिक प्रकाशसंश्लेषणाची क्षमता यामध्ये गाठली गेली. जीवाणू व अकार्बनी प्रकाशसंश्लेषण प्रणाली यात तयार करण्यात आली व त्याची पुनरावृत्ती घडवता आली. त्यात कॅडमियम सल्फाईडच्या नॅनोकणांचा वापर करून जैवअवक्षेप तयार करण्यात आला. त्याच्या मदतीने पेशीय चयापचयात सूर्यप्रकाश पकडण्याची क्षमता निर्माण करण्यात आली. ही सायबोर्ग क्षमता असून त्यामुळे जैविक संस्थांची कार्यक्षमता वाढते. अकार्बनी रसायनशास्त्रामुळे जैविक व अजैविक घटकांचे एकात्मीकरण शक्य झाले त्यातून सौर ऊर्जेचे रूपांतर रासायनिक ऊर्जेत करण्यात आले. प्रकाशसंश्लेषणात निसर्गतः सूर्यप्रकाश साठवून त्याचा वापर कबरेदकांच्या संश्लेषणासाठी केला जातो. कृत्रिम प्रकाशसंश्लेषणात इंधने व प्लास्टिक तयार करण्याच्या स्वच्छ, हरित व शाश्वत तंत्रज्ञानाची निर्मिती करता येते.

संशोधकांच्या मते कृत्रिम प्रकाशसंश्लेषण तंत्राने सौरऊर्जेतून रासायनिक ऊर्जा मिळवता येईल. एम थर्मोॲसेटिका व कॅडमियम सल्फाइडचे नॅनो कण यांच्या मिश्रणातून कार्बन डायॉक्साईडपासून ॲसेटिक ॲसिड तयार करता आले, त्याचे प्रमाणही बरेच होते असे यांग यांचे मत आहे. कॅडमियम सल्फाईड हे अर्धवाहक असून त्याची बंध रचना वेगळी आहे व ते कृत्रिम प्रकाशसंश्लेषणात उपयुक्त आहे. एम थर्मोॲसेटिका हे जीवाणू कृत्रिम प्रकाशसंश्लेषणात उपयुक्त आहेत. जीवशास्त्राची उत्प्रेरक शक्ती व अर्धवाहकांची प्रकाश साठवण क्षमता यांचा वापर यात करण्यात आला आहे. जैवघटक हे जैवरसायनशास्त्रात उपयोगी असतात व त्यांचे जैविक उपयोगही असतात. हे संशोधन जर्नल 'सायन्स'मध्ये प्रसिद्ध झालेले आहे.

## स्पर्शविरहित... हृदयस्नेही उपकरण



जगभरात हृदयविकाराने ग्रस्त असलेले लोक अनेक आहेत. याबाबत वेळीच जागरूक झाले तर संभाव्य धोका टाळता येऊ शकतो. कॅनडामधील संशोधकांनी याबाबतचे एक उपकरणही बनवलेले आहे. त्वचेला कोणताही स्पर्श न करता हृदयविकाराचा संभाव्य धोका सांगू शकणारे हे अनोखे उपकरण आहे. या उपकरणामध्ये कोडेड हेमोडायनामिक इमेजिंग ही पद्धती वापरण्यात आली आहे.

वेगवेगळ्या वेळी एखाद्या व्यक्तीच्या शरीरातील रक्ताचा प्रवाह कसा आहे, याचे निरीक्षण या उपकरणाच्या साह्याने केले जाऊ शकते. यासाठी संबंधित व्यक्तीच्या त्वचेला या उपकरणाचा स्पर्श होण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे संबंधित व्यक्तीला कोणताही त्रास न होता, त्याच्या हृदयाशी संबंधित गोष्टींचे मोजमाप केले जाऊ शकते. नवजात अर्भकांना या उपकरणाचा मोठा लाभ होऊ शकतो. एनआयसीयूमध्ये असलेल्या अर्भकांच्या हृदयाच्या कार्याचे मोजमाप करण्यासाठी हे उपकरण उपयुक्त ठरू शकणार आहे, असे संशोधकांनी म्हटले आहे. शरीराच्या वेगवेगळ्या भागामध्ये असलेला रक्तप्रवाह मोजण्याची क्षमता या उपकरणामध्ये असल्याचे कॅनडातील वॉटर्लू विद्यापीठातील संशोधक रॉबर्ट अमेलार्ड यांनी सांगितले. शरीराच्या वेगवेगळ्या भागातील रक्तप्रवाहाचे निरीक्षण या उपकरणाच्या साह्याने करता येणार असल्यामुळे शरीरामध्ये नेमक्या काय हालचाली घडता आहेत, हे समजू शकणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

## प्लूटोवर हिमनद्या आणि हिमशिखरे?



एकेकाळी आपल्या ग्रहमालिकेत स्थान असलेल्या प्लूटोला काही वर्षांपूर्वीच खगोलशास्त्रज्ञांनी एक खुजा किंवा बटु ग्रह (ड्वॉर्फ प्लॅनेट) ठरवून बाहेर काढले. अर्थात, तरीही त्याच्याविषयीचे कुतुहल कमी झालेले नाही. 'नासा'च्या न्यू होरायझन्स या अवकाशयानाने प्लूटोचे जवळून निरीक्षण केले होते. त्यावेळी या अवकाशयानाला तिथे गोठलेल्या हिमनद्या दिसून आल्या. तसेच बर्फाच्या तरंगत्या टेकड्याही दिसून आल्या. तेथील भूगर्भीय स्थिती आश्चर्यकारक असून, प्लूटोच्या भूगर्भात अनेक अभिक्रिया घडत असल्याचे स्पष्ट झाले. प्लूटोवर नायट्रोजनचा आणि पाण्याचाही बर्फ आहे.

बर्फाच्या तरंगत्या टेकड्या या अनेक किलोमीटर लांब असून, त्यांची छायाचित्रे 'न्यू होरायझन्स' या अवकाशयानाने टिपलेली आहेत. या बर्फाळ टेकड्या प्लुटोवरील हृदयाच्या आकाराच्या स्पुटनिक प्लॅनम या भागात आहेत. त्या भागाच्या पश्चिमेला मोठे बर्फाळ पर्वत आहेत. त्यांची ही लहान आवृत्ती आहे. नासाच्या मते, तेथील भागात अनेक वैशिष्ट्ये दिसून येतात. पाण्याचा बर्फ हा नायट्रोजन बर्फापेक्षा कमी घनतेचा असल्याने पाण्याच्या बर्फाचे टेकड्यांसारखे भाग तरंगताना दिसतात. त्या गोठलेल्या नायट्रोजनच्या सागरावर आहेत व पृथ्वीच्या आर्क्टिक महासागरातील हिमनगांसारख्या फिरत असतात. या टेकड्या स्पुटनिक प्लॅनम भागातील नायट्रोजन हिमनद्यांवरील साखळीच्या स्वरूपात विखुरलेल्या आहेत. हिमनद्यांच्या प्रवाहात त्या तयार झालेल्या आहेत. या टेकड्या मध्य स्पुटनिक प्लॅनमच्या मध्य भागातही पोहोचलेल्या आहेत. त्यामुळे नायट्रोजन बर्फाला गती प्राप्त झाली आहे. विशिष्ट विभागात त्या कडेला ढकलल्या जातानाही दिसतात. त्या २० किलोमीटपर्यंत पसरलेल्या आहेत. उत्तरेकडील चॅलेंजर कोलेस या भागात जास्त टेकड्या असून, त्या ६० बाय ३५ कि.मी. आकारात आहेत. नायट्रोजनचा बर्फ खोलवर आहे; पण पाण्याचा बर्फ वर आहे. न्यू होरायझन्स यानाच्या मल्टिस्पेक्ट्रल व्हिजिबल इमेजिंग कॅमेऱ्याने त्याची प्रतिमा टिपलेली आहे.

## गुरुच्या चंद्राचे गूढ उलगडले



पृथ्वीशिवाय अन्य खगोलांवर पाणी आहे का याचा सातत्याने शोध घेतला जात असतो. केवळ पाणीच नव्हे तर पर्यायाने अन्यत्र जीवसृष्टीचे अस्तित्व आहे का, याचाही शोध घेण्यात येत आहे. आता याच उद्देशासाठी आपल्या सौरमालिकेतील सर्वात मोठा ग्रह असलेल्या गुरुचा एक चंद्र 'युरोपा'कडे 'नासा'चे यान रवाना झाले आहे. सोमवारी ही 'युरोपा क्लिपर' मोहीम सुरु झाली. युरोपा या गुरुच्या चंद्रावर बर्फाच्या आवरणाखाली द्रवरूप पाण्याचा महासागर असल्याचे मानले जाते.

'नासा'ने म्हटले आहे की फ्लोरिडाच्या केप कॅनावरल येथून शक्तिशाली स्पेस एक्स फाल्कन हेवी रॉकेटवर स्वार होऊन 'युरोपा क्लिपर' यान सोमवारी, १४ ऑक्टोबरला रवाना झाले. या यानाबरोबर नऊ वैज्ञानिक उपकरणे जोडलेली आहेत. युरोपा क्लिपर हे यान साडे पाच वर्षांमध्ये २.९ अब्ज किलोमीटरचा प्रवास करून २०३० मध्ये गुरुच्या कक्षेत प्रवेश करील. 'नासा'चे अधिकारी जीना डिब्रॅकियो यांनी अलीकडेच म्हटले होते की पृथ्वीशिवाय अन्यत्र जीवसृष्टी शोधण्यासाठी गुरुचा 'युरोपा' नावाचा चंद्र सर्वाधिक आशादायक खगोल आहे. अर्थात या मोहिमेत थेटपणे जीवसृष्टीचाच शोध घेतला जाणार नाही, पण युरोपावर जीवसृष्टीला अनुकूल कोणते घटक आहेत, हे पाहिले जाईल.

युरोपा क्लिपर कार्यक्रमाचे वैज्ञानिक कर्ट नीबर यांनी सांगितले की मंगळ ग्रह अब्जावधी वर्षांपूर्वी राहण्यास योग्य असा ग्रह होता. मात्र युरोपा असा खगोल आहे जो आजही राहण्यास योग्य ठरू शकतो! युरोपाबाबतची माहिती विज्ञानाला सन १६१० पासूनच होती. यापूर्वी १९७९ मध्ये व्होएजर यानाद्वारे त्याची काही जवळून छायाचित्रे टिपण्यात आली होती. त्यावेळी त्याच्या पृष्ठभागावर काही रहस्यमय लाल रेषा दिसून आल्या होत्या. १९९० च्या दशकातही युरोपाबाबत संशोधन झाले होते व या चंद्रावर महासागराचे अस्तित्व असावे, असे त्यामधून स्पष्ट झाले होते. आता युरोपाच्या दिशेने रवाना झालेल्या युरोपा क्लिपर यानामध्ये चंद्राचे चुंबकीय बल मोजण्यासाठी कॅमेरे, एक स्पेक्ट्रोग्राफ, रडार आणि एक मॅग्नेटोमीटर यांच्यासह अन्य काही अद्ययावत उपकरणे आहेत. या चंद्रावर पाणी, ऊर्जा व काही विशिष्ट रासायनिक घटक आहेत का हे त्यांच्या सहाय्याने तपासले जाईल. त्याआधारे तिथे सूक्ष्म जीवांच्या स्वरूपात का होईना जीवसृष्टीचे अस्तित्व आहे का हे निष्पन्न होऊ शकेल.




## चॅटजीपीटीचा वापर आता मालवेअरसाठी

'ओपन एआय' कंपनीचे 'चॅट- जीपीटी' लॉंच झाल्यानंतर अल्पावधीतच लोकप्रिय झाले होते. त्यानंतर पाठोपाठ अनेक एआय टूल लॉंच झाले. त्यांचा गैरवापरही होऊ शकतो हे त्यापूर्वीपासूनच तज्ज्ञांकडून सांगितले जात होते. आता चॅट-जीपीटीचा गैरवापर हॅकर्स करीत असल्याचे समोर येत आहे. काही दिवसांपूर्वीच आलेल्या एका रिपोर्टनुसार, हॅकर्स मालवेअर तयार करण्यासाठी चॅट जीपीटीचा वापर करीत आहेत. स्वतः 'ओपन एआय' या कंपनीनेही त्याची पुष्टी केली असून, हॅकर्स मालवेअरचे कोड लिहिण्यासाठी 'चॅट जीपीटी' वापरत असल्याचे म्हटले आहे.

सायबर गुन्हेगार आता 'ओपन एआय'चे मॉडेल 'चॅट-जीपीटी'चा मोठ्या प्रमाणात गैरवापर करू लागले आहेत. मालवेअर बनवणे, चुकीची माहिती पसरवणे आणि स्पीयर-फिशिंगसारख्या खतरनाक कृत्यांसाठी हा वापर सुरू आहे. एका नव्या रिपोर्टनुसार, २०२४ च्या सुरुवातीपासूनच 'ओपन एआय'ने जगभरातील वीसपेक्षा अधिक फसवणुकीच्या कृत्यांना आळा घातला. 'एआय'च्या दुरुपयोगाची एक चिंताजनक प्रवृत्ती यामधून समोर आली होती. मालवेअर बनवणे व ते ठीक करणे, बनावट सोशल मीडिया व्यक्तित्त्वासाठी सामग्री तयार करणे आणि प्रभावशाली फिशिंग मेसेज बनवणे यासारख्या गोष्टी केल्या जात होत्या. 'ओपन एआय'चे म्हणणे आहे की, आमच्या टूलचा वापर मानवतेला लाभ मिळण्यासाठी व्हावा, हा आमचा मूळ उद्देश आहे. आमच्या मॉडेलचा हानिकारक उद्देशांसाठी दुरुपयोग होण्यापासून रोखण्यासाठी कंपनी लक्ष पुरवत आहे. कंपनीने यापूर्वी अशा गोष्टींबाबत कोणतेही वक्तव्य केले नव्हते. आता मात्रकंपनीने असे प्रकार घडत असल्याची पुष्टी करून, ते रोखण्यासाठी कंपनी प्रयत्न करीत असल्याचेही म्हटले आहे.

## धूम मूनवॉकर शूजची

चंद्रावर कमी गुरुत्वाकर्षण असल्याने तिथे अंतराळवीर जवळजवळ उड्या मारतच चालत असतात. त्याच्या चित्रफिती अनेकांनी पाहिलेल्या असतील. नासाच्या अपोलो मोहिमांच्या काळातील या चित्रफिती आहेत. आता पृथ्वीवरही चंद्रावर चालण्यासारखा अनुभव घेता यावा म्हणून अमेरिकेत मूनवॉकर बूटही बनवलेले आहेत. त्यांच्या मदतीने कमी गुरुत्वाचा म्हणजे चंद्रावर चालल्यासारखा अनुभव येतो.

हे बूट एम ४५ निओडायमियम चुंबकावर आधारित आहेत. हे चुंबक फार शक्तिशाली असतात. चुंबकाचे एन ३०, एन ४२, एन ४५ असे प्रकार असतात. चुंबकाची शक्ती ही त्यातील नियोडायमियम, लोह, बोरॉन यांच्या मिश्रणावर ठरते, असे अभियंता पॅट्रिक ब्रेजिरी यांनी सांगितले. त्यांनीच या बुटांची निर्मिती केली आहे. एन ४५ चुंबक शक्तिशाली व तुलनेने स्वस्तही असतात म्हणून त्यांचा वापर केल्याचे त्यांनी सांगितले. असे १२ ते १३ चुंबक एका थरात लावले जातात, दुसऱ्या थरातही १२ ते १३ चुंबक असतात. हे दोन्ही थर एकमेकांना दूर ढकलतात कारण त्यांच्यात प्रतिकर्षण तयार होते. ते एकमेकांना दूर सारत असल्याने आपण तरंगतो. या चुंबकांचे उत्तर ध्रुव एकमेकांशी जुळवलेले असतात. हे चुंबक अडीच ते पाच सें.मी. व्यासाचे असतात. ५ सें.मी. व्यासाचे चुंबक शक्तिशाली असतात, ते १२ किलो वजनही दूर ढकलू शकतात तर २.५ से. मी चे चुंबक २४ किलो वजन दूर ढकलू शकतात. चुंबक आपल्या पायाच्या क्षेत्रफळातील सर्व वजन वर ढकलतात. चुंबकाच्या दोन थरांमध्ये एक उशी तयार होते व त्यामुळे माणूस चालताना त्याचे पाय जमिनीला टेकत नाहीत. मूनवॉकर बूट घातल्यानंतर तुमचे वजन किती आहे याचा फरक पडत नाही, कारण १८३ किलोइतके वजन चुंबकाच्या दोन थरातील प्रतिकर्षणाने तोलले जाते. त्यापुढच्या वजनाला मात्र चुंबक काम करीत नाहीत.

## निर्मिती भेसळमुक्त मांसाची

जगात मांसाहार करणारे अनेक लोक आहेत; मात्र त्यासाठी प्राण्यांना मारले जात असल्याने तसे होऊ नये असे मानणाराही मोठा वर्ग आहेत. आधुनिक काळात त्यावर कृत्रिम मांसनिर्मितीचा पर्याय समोर आलेला आहे. भारतीय वंशाचे अमेरिकी वैज्ञानिक उमा एल व्हॅलेटी व त्यांच्या सहकाऱ्यांनी अमेरिकेत प्राण्यांच्या पेशींपासून भेसळमुक्त मांस प्रयोगशाळेत तयार केले होते. त्यामुळे प्राण्यांची मोठ्या प्रमाणावर होणारी कत्तल थांबू शकते.




या जैविक तंत्रज्ञानाचा वापर हा मोठ्या व्यावसायिक वापरासाठी केला तर येत्या काही वर्षांत मांसासाठी प्राण्यांची कत्तल करण्याची गरज भासणार नाही. प्राण्यांच्या पेशीपासून विकसित केलेले मांस चांगले व भेसळमुक्तही असणार आहे हा मोठा फायदा नाकारता येणार नाही असे व्हॅलेटी यांनी म्हटले होते. जैवतंत्रज्ञानाने बनवलेले हे मांस लोकप्रिय होईल व त्यामुळे प्राण्यांची मांसासाठी होणारी कत्तल थांबेल. यामुळे क्रूरतेला आळा बसेलच शिवाय शाश्वत स्वरूपाचा मांस स्रोत तयार करता येईल, असा विश्वास मेम्फिस मीटसचे सहसंस्थापक व हृदयरोगतज्ज्ञ व्हॅलेटी यांनी व्यक्त केला. त्यांच्या नेतृत्वाखालील वैज्ञानिकांनी भेसळमुक्त मांसाची निर्मिती केली असून त्यात जीवाणूंचा संसर्ग होत नाही शिवाय मेदसंपृक्त चरबीचे प्रमाण त्यात कमी असते. सुरक्षित, आरोग्यवर्धक असे मांस आम्ही तयार केले असून तो शाश्वत स्रोत आहे, असे व्हॅलेटी यांनी सांगितले. या पद्धतीने मांस तयार करताना प्राण्यांची कत्तल करावी लागत नाही, असे मूळ आंध्रच्या असलेल्या डॉक्टर व्हॅलेटी यांनी स्पष्ट केले, ते म्हणाले की, संबंधित प्राण्याच्या विशिष्ट पेशी घेऊन त्यांची वाढ केली असता हे मांस तयार झाले या पेशींना ऑक्सिजन व शर्करा - खनिजे ही पोषके देण्यात आली. नऊ ते एकवीस दिवसांत या पद्धतीने मांस तयार करता येते.

## धूमकेतू आदळले, वातावरण बदलले!

मंगळावर एकेकाळी वाहते पाणी होते. ग्रहाचा खडकाळ पृष्ठभाग, पाणी व योग्य वातावरण यामुळे एकेकाळी हा ग्रह जीवसृष्टीला अनुकूलही होता. मंगळावर ४ अब्ज वर्षांपूर्वी धूमकेतू व लघुग्रह आदळले, त्यामुळे तेथील वातावरणात बदल झाले. ते जीवसृष्टीस अनुकूल होते, ती स्थिती किमान काही काळ तरी तशीच होती, असे बोल्डर येथील कोलोरॅडो विद्यापीठाच्या वैज्ञानिकांनी म्हटले आहे.

मंगळावर आदळलेले धूमकेतू व लघुग्रह पश्चिम व्हर्जिनिया एवढ्या आकाराचे होते, असे मानले जाते. या विद्यापीठाचे प्राध्यापक स्टिफन मोझसिस यांनी सांगितले की, अगदी पूर्वीच्या काळी मंगळ ओसाड होता व आजच्यासारखा थंड होता; पण मोठ्या आकाराचे लघुग्रह व धुमकेतू आदळले, तेव्हा मंगळावर मोठ्या प्रमाणात उष्णता निर्माण झाली, त्यावरील बर्फ वितळले होते. पृथ्वीवर येलोस्टोन नॅशनल पार्क येथे जशी



हायड्रोथर्मल प्रक्रिया झाली होती, तशी प्रक्रिया तेथे घडली होती. आज येलोस्टोन पार्क या ठिकाणी आर्क्टिक भागात उकळत्या पाण्याच्या झऱ्यात सूक्ष्मजीव टिकू शकतात. तेथील आम्लधर्मी पाण्यात खिळे विरघळू शकतात. मंगळावर एकेकाळी पाणी वाहत होते. तेथे पूर्वीच्या काळी दऱ्यांमधून नद्या वाहत होत्या. त्रिभुज प्रदेश तयार झाले होते, असे मोझसिस यांचे म्हणणे आहे. मंगळावर हायपोथर्मल प्रक्रियेने बनलेले भाग हे सलग नव्हते. अचानक घडलेल्या घटनांमध्ये मंगळावरील वातावरणाचा दाब वाढला होता. त्यामुळे तेथील पृष्ठभाग तापला व जलचक्र पुन्हा सुरू झाले. मोझसिस हे भूगर्भवैज्ञानिक सांगतात की, या अभ्यासातून मिळालेल्या माहितीनुसार धूमकेतू व लघुग्रह यांच्या वर्षावातून हे घडले. पण, आतापर्यंत तरी मंगळावर जीवसृष्टी असल्याचे पुरावे मिळालेले नाहीत. त्यामुळे पूर्वीच्या काळी मंगळ खरोखर जीवसृष्टीस अनुकूल होता, याचीही पुरेशी सिद्धता झालेली नाही. अर्थ अँड प्लॅनेटरी सायन्स लेटर्स या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे.



अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाची राज्य कार्यकारी मंडळाची महत्त्वपूर्ण सभा प्रथमेश मंगल कार्यालय, टिटवाळा पूर्व (कल्याण) येथे पार पडली.

# शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत राज्य स्तरावर आंदोलन करणार

## अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाची राज्य कार्यकारिणी सभा

नगर – अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाची राज्य कार्यकारी मंडळाची सभा प्रथमेश मंगल कार्यालय, टिटवाळा पूर्व (कल्याण) येथे पार पडली. यात अनेक प्राथमिक शिक्षकांच्या प्रश्नांबाबत राज्य सरकार गांभिर्याने विचार करत नसल्यामुळे लवकरच राज्यभर धरणे आंदोलन केले जाणार असल्याची माहिती अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य संयुक्तसचिव राजेंद्र निमसे यांनी दिली.



राजेंद्र निमसे

सभेच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा संघाचे राज्याध्यक्ष देविदास बस्वदे होते. यावेळी राज्य सल्लागार सुरेश भावसार, विश्वनाथ सूर्यवंशी, राज्य सरचिटणीस कल्याण लवांडे, वरिष्ठ राज्य उपाध्यक्ष किरण पाटील, दीपक भुजबळ, संतोष कदम, प्रमोद पाटील, राजेंद्र निमसे, विजय मन्वर, माया चाफले, महादेव देसाई, भगवान पाटील यांच्यासह राज्यभरातील पदाधिकारी उपस्थित होते.

या सभेत शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्या आणि समस्यांवर चर्चा झाली. या चर्चेत संचमान्यता रद्द करण्यासाठी जिल्हावार न्यायालयीन प्रक्रिया सुरू करून आंदोलनाचा निर्णय घेणे, बीएलओची कामे राज्य शासनाने अशैक्षणिक म्हणून जाहीर केलेली असतानाही ती बंधनकारक असणे, शिक्षण सेवक पद रद्द करणे किंवा त्यांचा कार्यकाल मर्यादित करणे, समान काम समान वेतन धोरणानुसार मानधन वाढ करणे, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक आणि विस्तार अधिकारी या रिक्त पदांची तात्काळ भरती करणे, पदवीधर शिक्षकांना अतिरिक्त न ठरविणे, सर्व शिक्षकांना सरसकट बारा वर्षाची वरिष्ठ व २४ वर्षाची निवड वेतनश्रेणी लागू करणे, शालेय पोषण आहाराच्या प्रलंबित देयकांची मंजुरी व यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे, केंद्रप्रमुख पदासाठी परीक्षा दोन वर्षांपूर्वी फॉर्म भरल्यानंतरही न घेता आलेली असून ती तात्काळ घेण्यात यावी, दहा, वीस, तीस ची आश्वासित पदोन्नती योजना शिक्षकांना तत्काळ लागू करावी. एम एड, नेट सेट व पीएचडी या उच्चाशिक्षित शिक्षकांना विनाविलंब प्रशासकीय सेवेत समाविष्ट करावे, शिक्षकांसाठी कॅशलेस मेडिक्लेम योजना तात्काळ लागू करावण्यात आदी मागण्यांबाबत लवकरात लवकर अंमलबजावणी व्हावी, यासाठी संघटनेमार्फत शासनाकडे निवेदन सादर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

या निर्णयाचे स्वागत अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्यसरचिटणीस कल्याण लवांडे, राज्य संयुक्त सचिव राजेंद्र निमसे, राज्यसंघटक बाळासाहेब कदम, संघाचे जिल्हाध्यक्ष शरद वांढेकर, ऐक्य मंडळाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप चक्रनारायण, संघाचे जिल्हा सरचिटणीस सुनील शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष विलास लवांडे, जिल्हा कोषाध्यक्ष सुधीर बोऱ्हाडे, ऐक्य मंडळाचे जिल्हा सरचिटणीस सुरेश नवले, जिल्हा कार्याध्यक्ष सुधीर रणदिवे, जिल्हा कोषाध्यक्ष दत्तात्रय परहर, उच्चाधिकार समितीचे जिल्हाध्यक्ष रामप्रसाद आव्हाड, जिल्हा सरचिटणीस शिवाजी ढाकणे, डीसीपीएसचे जिल्हाध्यक्ष संदीप भालेराव, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष अनिता उदबत्ते, संघाचे नगर तालुकाध्यक्ष पांडुरंग देवकर, संघाचे पाथर्डी तालुकाध्यक्ष भारत शिरसाठ आदींनी केले आहे.

# भारतीय निवडणूक कायद्यांनुसार मतदारांची नावे केंद्रीकृत स्वरूपात समाविष्ट किंवा वगळण्याची कोणतीही तरतूद नाही

## मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य

मुंबइ – भारतीय निवडणूक कायद्यांनुसार, मतदारांची नावे केंद्रीकृत स्वरूपात समाविष्ट किंवा वगळण्याची कोणतीही तरतूद नाही. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० व मतदार नोंदणी नियम, १९६० नुसार, मतदारयादी मतदानकेंद्रनिहाय तयार करण्यात येते. राज्यभरातील २८८ मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी (EROs) ही यादी जवळपास एक लाख मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLOs) यांच्या मदतीने क्षेत्रीय पडताळणी करून तयार केली. या प्रक्रियेत सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांशी, सतत माहितीची देवाणघेवाण केली जाते. आक्षेप घेण्यासाठी आणि अपील करण्यासाठी भरपूर संधीही दिली जाते. मतदारयादीत नावांची भर घालणे किंवा वगळणे याबाबत काही अतिशयोक्त दावे करण्यात आले असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी कळविले आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांबाबत प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध लेखाच्या अनुषंगाने, काही बाबी स्पष्ट करणे आवश्यक असल्याचेही मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांनी कळविले आहे.

ऑगस्ट २०२४ मध्ये, विधानसभा निवडणुकांपूर्वी, विशेष संक्षिप्त पुनरिक्षण करण्यात आले आणि एक लाखाच्या आसपास असलेल्या प्रत्येक मतदान केंद्रासाठी प्रारूप व अंतिम मतदार यादींच्या (सॉफ्ट आणि हार्ड कॉपी) प्रती सर्व मान्यताप्राप्त पक्षांना प्रदान करण्यात आल्या होत्या.

महाराष्ट्रातील मतदारसंख्येच्या वाढीबाबत लेखातील माहिती दिशाभूल करणारी आहे. वास्तविक माहिती पुढीलप्रमाणे आहे :

२०१९ च्या विधानसभा निवडणुकांपासून २०२४ च्या लोकसभा निवडणुकांदरम्यान १.३९ कोटी नावांची भर पडली, तर १.०७ कोटी नावांची वजाबाकी झाली. त्यामुळे एकूण निव्वळ वाढ ३२.२५ लाख मतदारांची झाली.

२०२४ लोकसभा ते २०२४ विधानसभा निवडणुका या काळात ४८.८२ लाख नवीन नावे जोडली गेली, आणि ८ लाख वगळली गेली. त्यामुळे निव्वळ वाढ ४०.८१ लाख इतकी होती. त्यात १८ ते २९ वयोगटातील २६ लाखांहून अधिक नवमतदार होते.

एकूण भर (Gross Addition) ही २०१९ ते लोकसभा २०२४ मध्ये १.३९ कोटी, आणि लोकसभा २०२४ ते विधानसभा २०२४ मध्ये ४८.८२ लाख इतकी होती.

मतदारांची संख्या प्रक्षेपित प्रौढ लोकसंख्येपेक्षा अधिक का आहे यासंदर्भातही स्पष्टीकरण आवश्यक असून कोणतेही आकडेवारीचे साधन हे केवळ सांख्यिकीय अंदाजासाठी असते. मतदार नोंदणी ही प्रत्यक्ष फॉर्म्स, क्षेत्रीय पडताळणी, आणि कायद्याने ठरवलेल्या प्रक्रियेनुसार निर्णय घेऊन केली जाते. ही प्रक्रिया संपूर्ण पारदर्शक असते आणि सर्व मान्यताप्राप्त पक्षांशी यामध्ये सातत्याने समन्वय साधला जातो.

मतदारयाद्यांचे पुनरिक्षण करताना प्रत्येक राजकीय पक्षाने बूथ लेव्हल एजंट (BLA) नेमलेले असतात. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने महाराष्ट्रात २८,४२१ बीएलए नियुक्त केले होते. निवडणुकीचे निकाल लागेपर्यंत या एजंटांकडून किंवा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या उमेदवारांकडून कोणतीही गंभीर तक्रार प्राप्त झालेली नाही. ही बाब निवडणुकीनंतरच उपस्थित केली गेली आहे.

### मतदार याद्यांचे वाटप

मतदार यादी दरवर्षी सहभागात्मक पद्धतीने पुनरिक्षणाद्वारे अद्ययावत केली जाते. या प्रक्रियेत प्रारूप आणि अंतिम स्वरूपातील यादी सर्व मान्यताप्राप्त पक्षांना विनामूल्य दिली जाते. हीच प्रक्रिया २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ मध्येही राबवण्यात आली होती आणि यादी पक्षांना देण्यात आली होती.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी वापरण्यात आलेली संपूर्ण मतदारयादी आयोगाच्या वेबसाइटवर सार्वजनिकरित्या डाउनलोडसाठी उपलब्ध आहे.

मतदार नोंदणी नियम १९६० च्या नियम ३३ नुसार कोणतीही व्यक्ती, संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे अर्ज करून निर्धारित शुल्क भरून मतदारयादीची प्रत मिळवू शकतो.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने (INC) नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांनंतरही अशाच स्वरूपाचे मुद्दे उपस्थित केले होते. निवडणूक आयोगाने दि. २४ डिसेंबर २०२४ रोजी यावर सविस्तर उत्तर दिले आहे. त्या उत्तराची प्रत आयोगाच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

(खाली लिंक दिली आहे) https://www.eci.gov.in/eci-backend/public/api/download?url=LMhK6sOPBp%2FNFF0iRfXbEB1EVSLT41NNLRjYNJJP1KivrUxbfqkDatmHy12e%2FzPKLkuiExxOKadHYzWQYgrziMWVM9RdSa49qKKjiLLCWX%2FdIawdRjv6W2GoknYcyLIzu4lIXP3VRXySBy%2F%2Bwg%3D%3D

# भिंगार कॅम्प पोलीस ठाणे हद्दीतील २ सराईत गुन्हेगारांना केले हद्दपार

नगर – भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात रेकॉर्डवर असलेले सराईत गुन्हेगार मोईन बादशहा शेख (रा.बडी मशिदजवळ, मुकुंदनगर, अ.नगर) सरवर उर्फ भिम्या अस्लम शेख (रा. सुभेदार गल्ली, झेंडीगेट, अ.नगर) यांना प्रांताधिकारी सुधीर पाटील यांनी नगर जिल्ह्यातून ६ महिन्यासाठी हद्दपार करण्याचे आदेश काढले आहेत.

याबाबतचा प्रस्ताव भिंगार कॅम्प पोलिसांनी सादर केला होता. या प्रस्तावाची परिपूर्ण चौकशी करुन हद्दपार केले बाबतचा आदेश प्रांताधिकारी सुधिर पाटील यांनी ११ जून रोजी काढला. या आदेशान्वये मोईन शेख, सरवर शेख यांना तात्काळ ताब्यात घेऊन नगर जिल्ह्याचे सरहद्दीचे बाहेर सोडण्यात आले आहे. ही कारवाई सहा. पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार रेखा पुंड, दिपक शिंदे, रवि टकले, सतिश थोरात, प्रमोद लहारे, संदिप घोडके, समीर शेख यांनी केली आहे.

# शहरातील कोठला येथील हॉटेलला मध्यरात्री लागली भीषण आग

## अग्निशमन दलाच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला; मात्र मोठे आर्थिक नुकसान

नगर – शहरातील कोठला, राज चेंबर्स परिसरात असलेल्या ओन्ली कुरेशी हॉटेलला ११ जून रोजी रात्री अचानक भीषण आग लागली. हॉटेल बंद झाल्यानंतर रात्रीच्या सुमारास ही आग लागली. हॉटेलमधील काम आटोपून कर्मचारी स्टाफ रुममध्ये विश्रांती घेत असताना त्यांना हॉटेलमध्ये आग लागल्याचा फोन आला.

संदेश मिळताच कर्मचारी तात्काळ घटनास्थळी धावले व त्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी तातडीने अग्निशमन विभागाला संपर्क करून आग लागल्याची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे बंब तत्काळ घटनास्थळी दाखल झाले व त्यांच्या प्रयत्नांनी आग नियंत्रणात आणण्यात यश आले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.



कोठला येथील हॉटेलला मध्यरात्री लागलेली आग व जळालेले साहित्य.

या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी हॉटेलचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. हॉटेलमधील फर्निचर, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, किचन साहित्य आदी जळून खाक झाले. हॉटेलचे संचालक समीर कुरेशी यांनी आग कोणी लावली का? किंवा ती शॉर्टसर्किटमुळे लागली याचा अद्याप खुलासा झालेला नाही. यासंदर्भात योग्य ती चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आम्ही प्रशासनाकडे केली असल्याची माहिती दिली. सध्या आग लागण्याचे कारण अस्पष्ट असून संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू आहे.

# नगरमधील सराईत गुन्हेगार ६ महिन्यासाठी जिल्ह्यातून हद्दपार

नगर – कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेकॉर्डवरील गुन्हेगार शुभम विजय लोळगे (वय २६, रा. दत्त डेअरी जवळ, कायनेटीक चौक, अ.नगर) पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशाने ६ महिन्यासाठी नगर जिल्हा हद्दीतून ६ महिन्यांसाठी हद्दपार करण्यात आले आहे.



हद्दपारीच्या कारवाईसाठी ताब्यात घेतलेल्या सराईत गुन्हेगारासोबत कोतवाली पोलिसांचे पथक.

गुन्हेगार शुभम लोळगे हा प्रामुख्याने त्यांचे साथीदारांसह लोकांमध्ये बळाचा व दहशतीचा वापर करुन लोकांच्या मनामध्ये भितीचे वातावरण निर्माण करणे तसेच चाकू सारख्या घातक शस्त्राचा वापर करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, विनयभंग करणे, कुऱ्हाडीसारखे घातक शस्त्र जवळ बाळगुन दहशत करणे, मारहाण करुन जबरी चोरी सारखे गंभीर गुन्हे करुन सामाजिक शांतता बिघडविणे अशा प्रकारचे गुन्हेगारी कृत्य सातत्याने करीत होता. त्याचे विरुध्द कोतवाली पोलीस ठाण्यात जबरी चोरी, विनयभंग, मारहाण, धमकावणी, खुनाचा प्रयत्न, शस्त्र बाळगणे असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहे.

त्याच्या गुन्हेगारी वर्तनात दिवसेंदिवस वाढच होत असल्याने त्याचे हातुन भविष्यात गंभीर स्वरुपाचा गुन्हा घडुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता निर्माण होत असल्याचे दिसुन आल्याने पोलीस अधीक्षक यांचे आदेशाने त्याचेविरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये नगर जिल्ह्यातून हद्दपार करणेबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयामार्फत उपविभागीय दंडाधिकारी यांना पाठविण्यात आला होता. या प्रस्तावाची परिपुर्ण चौकशी करुन गुन्हेगार शुभम लोळगे यास नगर जिल्ह्याच्या हद्दीतुन ६ महिन्यासाठी हद्दपार केल्याचे आदेश कोतवाली पोलीस ठाण्याला प्राप्त झाले. पो. नि. दराडे यांचे आदेशान्वये शुभम लोळगे यास पोलीस ठाण्यात आणून त्याची कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करुन त्यास नगर जिल्ह्याच्या हद्दीबाहेर सोडण्यात आले.

ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रविण पाटील, पोलीस अंमलदार विशाल दळवी, संदिप पितळे, रोहिणी दरंदले, शिल्पा कांबळे, दिपक रोहोकले, तानाजी पवार, सुरज कदम, सचिन लोळगे, शिरीष तरटे, अतुल कोतकर, सोमनाथ केकान, महेश पवार, याकुब सय्यद, राहुल मासाळकर, प्रतिभा नागरे, दक्षिण विभाग मोबाईल सेलचे पोलीस अंमलदार राहुल गुंडु यांनी केली आहे.

# आगरकर मळा येथील ‘बिंगो’ अड्ड्यावर छापा

## दोघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल, मुद्देमाल पोलिसांनी केला जप्त

नगर – मोबाईल फोनवर सुरु असलेल्या बिंगो जुगार अड्ड्यावर कोतवाली पोलिसांनी छापा टाकत ५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून एकाच ताब्यात घेतले असून त्याच्या सह अन्य एकावर गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई रेल्वे स्टेशन रोडवरील आगरकर मळा येथे १२ जून रोजी केली.

कोतवाली पोलिसांना माहिती मिळाली की, आगरकर मळा, येथे एक इसम हा मोबाईल फोनवर बिंगो गेम हा हारजितीचा जुगार खेळतो व खेळवित आहे. अशी माहिती मिळाल्याने पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला असता तेथे गौरव राजु पडोळे (वय २३,रा. आगरकर मळा, बेलेश्वर कॉलनी अ.नगर) हा त्याचे हातातील मोबाईल फोनमध्ये काहीतरी खेळताना दिसला. त्यास जागीच पकडुन त्याचे कडील मोबाईलची पाहणी केली असता त्याचेकडील ओपो कपंनीचा एक अँड्रॉईड मोबाईल फोनमध्ये फनरिप (बिंगो) हा सुरु असल्याचे व त्या साईडवरुन सदर अॅपव्दारे गेम खेळुन, त्याव्दारे लोकांना पैशाची देवाण घेवाण झाल्याचे दिसुन आले. तसेच बिंगोचा स्कोअर व मार्केट अँनालिसिस असे चालु असल्याचे दिसुन आले. पोलिसांनी त्यास सदर बिंगो जुगाराबाबत विचारपुस करता त्याने हा बिंगो जुगार मी केतन गोयल (रा.सावेडी अ.नगर) याचे सांगणेवरुन खेळत असल्याचे सांगितले आहे. त्याच्या मोबाईल वरुन फोन पे ने पैसे घेतल्याचे तसेच त्यांचे मोबाईल फोन वर फन रिप ही साईट सुरु असल्याचे व त्याव्दारे जुगार खेळतांना दिसुन आला आहे.

या प्रकरणी पो. कॉ. अमोल गाढे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गौरव पडोळे, केतन गोयल यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी महानगरपालिकेशी संपर्क साधावा

## आयुक्त यशवंत डांगे यांचे आवाहन; रस्त्यांवर पडलेल्या फांद्या, पाला पाचोळा उचलण्याचे काम सुरू

नगर – बुधवारी सायंकाळी झालेल्या वादळी पावसामुळे अहिल्यानगर शहर व उपनगर परिसरात अनेक ठिकाणी छोटी मोठी झाडे उन्मळून पडली. शहरातील वसाहती, प्रमुख रस्त्यांवर झाडांच्या फांद्या, पाने पडून कचरा साचला होत. महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेमार्फत रात्रीपासूनच पडलेली झाडे हटवून रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यासाठी काम सुरू झाले आहे. अनेक ठिकाणी रात्रभर यंत्रणा कार्यरत होती. आता गुरुवारी सकाळपासून शहरातील रस्ता वसाहतींमध्ये पडलेला पाळा पाचोळा, फांद्या हटवण्याचे काम सुरू करण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.



वादळी वाऱ्यामुळे महावीर कलादालन, वैभव हॉटेल, कानडे मळा, बोल्हेगाव, मुकुंदनगर, भिस्तबाग चौक, पंकज कॉलनी, नवले नगर, रेल्वेस्टेशन, कातोरे वस्ती बोल्हेगाव अशा विविध ठिकाणी मोठी झाडे पडली. काही ठिकाणी वाहतूक ठप्प झाली होती. तर काही ठिकाणी विद्युत वाहक तारांवर झाडे व फांद्या पडल्या. स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधींकडून मिळालेल्या सूचनेनुसार संबंधित भागात महापालिकेकडून तत्काळ पथक पाठवून मदतकार्य सुरू करण्यात आले. अनेक ठिकाणी रात्रभर पडलेली झाडे, मोठ्या फांद्या हटवण्याचे काम सुरू होते.

पावसामुळे शहरात अनेक ठिकाणी झाडांची पडझड झाली आहे. गुरुवारी दिवसभर माहिती मिळेल, त्यानुसार पडलेली झाडे, रस्त्यांवरील फांद्या, पाला पाचोळा व इतर कचरा उचलण्याचे काम सुरू आहे. आपत्कालीन काळात उपाययोजना व मदतकार्यासाठी महानगरपालिकेची यंत्रणा सज्ज आहे. नागरिकांनी मदतीसाठी संबंधित प्रभाग अधिकारी, उद्यान विभाग किंवा अग्निशमन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.

# सावेडीतून केबलची चोरी

नगर – रस्त्याचे कडेला भुमीगत केलेले केबलचे मेनहोल मधून कुणीतरी अज्ञात चोरट्याने बीएनएसएल कंपनीची ७५ हजार रुपये किमतीची ३४७ मीटर टेलिफोनची केबल चोरुन नेल्याची घटना सावेडी परिसरातील सिव्हिल हाडको येथील गणेश चौक येथे १२ जून रोजी घडली.

या बाबत बीएसएनएल चे उपविभागीय अभियंता (सावेडी) सुधीर मारुतीराव सोळसे (वय ४८, रा. ओंकार कॉलनी शेजारी, दत्तनगर, नागापूर, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की ८ जून रोजी दुपारी तारकपूर येथे मोबाईल टॉवर मध्ये अडचण आल्याने फिर्यादी हे गणेश चौक, सिव्हील हाडको अ.नगर. या परीसरातुन जात असताना त्या परीसरातील भुमीगत केलेले बीएसएनएल कंपनीचे केबल असलेले सर्व मेन होल सुस्थीतीत असलेले पाहिले होते.

१२ जून रोजी सकाळी ११ वाजण्याचे सुमारास फिर्यादी हे सावेडी पोस्ट ऑफीस येथे जात असताना गणेश चौक, सिव्हील हाडको अ.नगर सावेडी पोस्ट ऑफीस समोरील रस्त्याचे काम चालु होते. तेव्हा रस्त्याचे कडेला भुमीगत केलेले केबलचे मेनहोल उघडे दिसले. म्हणुन फिर्यादी यांनी ते तपासले असता त्या मेनहोल मधुन भुमीगत केलेले बीएसएनएल कंपनीची टेलीफोन केबल तुटलेली दिसली. तेव्हा फिर्यादी यांनी तुटलेल्या केबलची पाहणी केली असता, सावेडी पोस्ट ऑफीसच्या समोरील ते गणेश चौकादरम्यान असणाऱ्या दोन मेनहोलच्या दरम्यानची ३४७ मिटर केबल दिसुन आली नाही. त्यामुळे या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात सुधीर सोळसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गौवंश हत्या पूर्णपणे रोखायची असेल तर गौवंश विक्रीवर सुद्धा बंदी आणावी

नगर – महाराष्ट्रामध्ये गौवंश हत्याबंदी कायदा लागू करून त्याची अंमलबजावणी करण्यात आली. जो व्यक्ती गौवंशची वाहतूक करत असेल किंवा जनावरांची कत्तल करत असेल ते दोषी आहेत. त्यांच्यावर कारवाई होत असताना जागोजागी दिसत आहे. परंतु जो गाय व त्याचे वासरू विकत असेल, मग तो कोणत्याही परिस्थितीत असो, त्याच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने, गौवंश ही सर्रासपणे बाजारात विकली जाते. एकीकडे गौवंश हत्याबंदी कायद्याची अंमलबजवणी करायची व दुसरीकडे बाजारात विकण्यास प्रतिबंध नाही. याचा अर्थ की, राज्यात गुटखाबंदी कायदा आहे परंतु त्याची कंपनीला निर्यात करण्याची कोणतीही बंदी नाही. गौवंश हत्या पूर्णपणे रोखायची असेल तर गौवंश विक्रीवरसुद्धा बंदी आणावी लागेल. जर कायद्यात बदल करून गौवंश विकणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईची तरतूद केली तर मग गाय आणि गौवंश विकणे बाजारात बंद होईल. त्यामुळे गौवंश हत्या शंभर टक्के थांबेल. यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा, ही जनतेची इच्छा आहे.



डॉ. परवेज अशरफी

त्याचप्रमाणे जी जनावरे काही धार्मिक, जातीवादी संघटनांमार्फत किंवा पोलीस प्रशासनामार्फत पकडली जातात, त्यांना न्यायालयाच्या आदेशाने गौशाळेत पाठवण्यात येते. परंतु या गोशाळेचे कोणत्याही प्रकारचे ऑडिट होत नसल्याचे दिसते. यामुळे गौशाळेत पाठवलेली जनावरे सुरक्षित आहेत की नाही, असा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे. कारण काही दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यातून जनावरे पकडून त्यांना गौशाळेत पाठवण्यात आले होते. जेव्हा त्या व्यक्तीने, न्यायालयाच्या आदेशाने गौशाळेतून आपली जनावरे सुटका करून घेण्यास गेला, तेव्हा त्याला मोठा धक्का बसला. त्याची जी जनावरे पकडण्यात आली होती, त्यापैकी एकही जनावर तेथे नव्हते. त्याऐवजी त्याला दुसरे जनावर गौशाळेतील लोकांनी दिले. याचा अर्थ पकडलेली जनावरे कोणत्या ना कोणत्या मार्गाने गोशाळेतून गायब झाली किंवा गायब करण्यात आली.तसेच गौशाळेत जेव्हा सर्व सुविधा पुरविण्यात येतात तर तेथे जनावरांचे मृत्यू होण्याचे कारण काय आणि मृत्यूचे प्रमाण किती? न्यायालयाचा आदेश झाल्यानंतर खरच संबंधित व्यक्तीला त्याची पकडलेली जनावरे दिली जातात का, त्याला दम देऊन दुसरे जनावरे त्याच्या गळ्यात मारले जाते?

दोन्ही विषय महत्वाचे असून, भारतातील बहुसंख्य नागरिकांच्या आस्थेशी जुळलेले आहे. यामुळे या विषयाचा गांभीर्यपूर्वक विचार करून कायद्यात बदल करून दोषींवर कारवाई करावी. जर गौवंशाची विक्रीच केली नाही तर कोणीही वाहतूक करणार नाही आणि कोणीही कत्तल करणार नाही, असे मत एमआयएमचे जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अशरफी यांनी व्यक्त केले.

याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री, गृहमंत्री, उपमुख्यमंत्री, अजित पवार, अल्पसंख्याक आयोग, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र शासन, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधिक्षक, पालकमंत्री यांना पाठविल्याचे ते म्हणाले.

